रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १२९
www.ramprahar.com

रविवार, २६ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कर्जतमध्ये ओबीसी संघटना एकवटल्या/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत रायगडला दुहेरी यश/८

## ओबीसी समाजाचा आज हिंगोलीत एल्गार मेळावा



**हिंगोली :** जालन्यातील सभेनंतर रविवारी (दि.२६) हिंगोलीत ओबीसी समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला मंत्री छगन भुजबळ, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, प्रकाश शेंडगे यांच्यासह अनेक ओबीसी नेते उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याची तयारी पूर्ण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन अलर्ट झाले आहे. हिंगोली शहरातील रामलीला मैदानावर ओबीसी एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास हिंगोलीसह इतर जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात ओबीसी जनसमुदाय येण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात १३ पोलीस ठाण्यांसाठी प्रत्येकी एक या प्रमाणे १३ विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा लढाऊ बाणा; तेजस फायटर जेटमधून केले उड्डाण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दरवर्षी सैन्य दलातील जवानांसोबत दिवाळी साजरी करतात. जवानांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांचे मनोबल वाढवतात तसेच त्यांच्यासोबत संपूर्ण देश असल्याचा विश्वास देतात. आता पंतप्रधान मोदींनी तेजस या फायटर जेटमधून सफर केली आहे. या लढाऊ सफरीचे फोटो त्यांनी आपल्या ट्विटर अकाउंटवरून शेअर करीत देशवासीयांचे अभिनंदनही केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच थ्रीलींग अनुभव घेत असतात. कधी जंगलात जाऊन भ्रमंती करतात, तर कधी समुद्रात बोट सफारीचाही अनुभव घेतात. त्यांनी शनिवारी (दि.२५) थेट तेजस फायटर जेट चालवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. भारतीय सैन्य दलात नव्याने दाखल झालेल्या तेजस या फायटर जेटची स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सफर केली.

पंतप्रधान मोदी बंगळुरूच्या हिंदुस्तान एयरोनॉटिक्स लि.येथे पोहचले होते. तेथील मॅन्युफॅक्चरींग हबची त्यांनी पाहणी केली. त्याचप्रमाणे तेजस लढाऊ विमानातून उड्डाणही भरले. या संदर्भात पंतप्रधान मोदींनी ट्विटरवरून माहिती देत डीआरडीओ, वायूदल आणि देशवासीयांचे अभिनंदन केले.



*हा अनुभव अविश्वसनीय असा होता. या उड्डाणामुळे आपल्या देशातील स्वदेशी उत्पादनाच्या ताकदीवरील माझा विश्वास आणखी बळावला आहे. देशाच्या राष्ट्रीय क्षमतेचा आणि ताकदीचा मला अभिमान वाटत असून नवीन आशावादही निर्माण झाला आहे. संपूर्ण देशवासीयांचे अभिनंदन!*

**–नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

# ...तर भारत जगातील तिसरी महासत्ता

## केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांचा विश्वास

**पुणे : प्रतिनिधी**

दहा वर्षांपूर्वी भारताची अर्थव्यवस्था डबघाईला आली होती. परदेशात भारतीय व्यापारी, उद्योजकांना फारसे महत्त्व दिले जात नव्हते. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डबघाईस आलेली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी काम केले. कमकुवत बाजूंचा विचार न करता देशाची आर्थिक व्यवस्था सशक्त करण्यासाठी प्रयत्न केले. पायाभूत सुविधांचा विस्तार केला. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरली आहे. मोदी पुन्हा सत्तेवर आले, तर आपली अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची ठरेल, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी व्यक्त केला.





दि पूना मर्चंट्स चेंबरकडून व्यापारमहर्षी स्व. उत्तमचंदजी तथा बाबा पोकर्णा यांच्या स्मृतीदिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या आदर्श व्यापारी पुरस्काराचे वितरण केंद्रीय मंत्री गोयल यांच्या हस्ते शनिवारी (दि.२५) झाले. त्या वेळी ते बोलत होते. अरुण दांडेकर, रमेश कोंढरे, पुरुषोत्तम लोहिया, राजेश शहा, शुभम गोयल यांना व्यापारक्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर प्रवीण डोके यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस.के. जैन, लायन्स क्लबचे विजय भंडारी, चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, उपाध्यक्ष अजित बोरा, सचिव रायकुमार नहार, प्रवीण चोरबेले, उत्तम बाठिया, ज्येष्ठ व्यापारी वालचंद संचेती, आशिष दुगड, दिनेश मेहता, नवीन गोयल उपस्थित होते.

मंत्री गोयल पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष सत्तेवर येण्यापूर्वी देशाची अर्थव्यवस्था कमकुवत होती. अर्थव्यवस्था ढासळत असताना कोळसा, दूरसंचार घोटाळ्याचे प्रकार उघडकीस आले होते. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवले. त्यानंतर अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी वित्तीय तुटीचा दर कमी करण्यास प्राधान्य दिले गेले. त्यामुळे गेल्या दहा वर्षात महागाईचा दर साडेचार टक्के ते सात टक्के राहिला. व्याज दर कमी झाले. परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिल्याने गुंतवणुकीत मोठी वाढ झाली. निर्यातवाढीसाठी चालना देण्यात आली. सामान्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनामुळे नागरिकांचा मोदी सरकारवरचा विश्वास वाढला.

### राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# रायगड केंद्राच्या प्राथमिक फेरीला सुरुवात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या रायगड केंद्राच्या प्राथमिक फेरीला सुरुवात झाली असून या ठिकाणी स्पर्धेचे ब्रँड ॲम्बेसिडर अजिंक्य ननावरे यांनी शनिवारी (दि.२५) भेट देत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष आहे. या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इतरही पारितोषिके आहेत, तर यंदाच्या जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या स्पर्धेच्या रायगड केंद्राच्या प्राथमिक फेरीला २४ नोव्हेंबरपासून खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात सुरुवात झाली आहे. या ठिकाणी स्पर्धेचे ब्रँड ॲम्बेसिडर अजिंक्य ननावरे यांनी शनिवारी भेट देऊन स्पर्धकांशी संवाद साधला आणि त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, गणेश जगताप यांच्यासह स्पर्धक उपस्थित होते.

## निवडक

### पत्रकार सौम्या विश्वनाथ हत्या प्रकरणातील आरोपींना जन्मठेप

**नवी दिल्ली :** येथील टीव्ही पत्रकार सौम्या विश्वनाथ हत्या प्रकरणात चार दोषींना दुहेरी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सॅकेट कोर्टाने दोषींना दंडही ठोठावला आहे. रवी कपूर, अमित शुक्ला, बलजीत मलिक आणि अजय कुमार अशी आरोपींची नावे असून पाचवा आरोपी अजय सेठी उर्फ चाचा याची शिक्षा पूर्ण झाल्याने त्याची तुरुंगातून सुटका होणार आहे.

### आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आगामी १९ वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेसाठी संघाची घोषणा केली आहे. युएईमध्ये ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत पंजाबचा उदय सहारन भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. संघात नाशिकचा अष्टपैलू अर्शिन कुलकर्णी व बीडचा सचिन धस यांनाही संधी देण्यात आली आहे.

# प्रत्येक आदिवासीवाडी-पाड्याला वीज द्या

### आमदार महेश बालदी यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन होत आहे. त्या अनुषंगाने महावितरण कंपनीच्या वतीने रायगड जिल्ह्यातील वीज वितरण प्रणालीसंबंधी सर्वसाधारण आढावा सभा खांदा कॉलनी येथे झाली. या वेळी आमदार महेश बालदी यांनी प्रत्येक आदिवासी वाडी, पाड्यांमध्ये लवकरात लवकर वीज पोहचली पाहिजे, अशी आग्रही मागणी करीत वन विभागाच्या परवानग्या तसेच इतर तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे नमूद केले.







म.रा.वि.वि.मं.कंपनी मर्यादितचे संचालक (स्वतंत्र) विश्वास पाठक आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीस संचालक अरविंद भाडीकर, मुख्य अभियंता सुनील काकडे तसेच अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.

या वेळी महावितरण कंपनीतर्फे मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०, नवीन पुनरोत्थान वितरण क्षेत्र योजना, शेतकऱ्यांना तत्काळ वीज जोडणी उपलब्ध करणे यासारखी महत्त्वाची कामे चालू आहेत. त्याचबरोबर दिवसेंदिवस वाढणाऱ्या मागणीनुसार बीज प्रणालीचे क्षमतावर्धन, वीज पारेषणचे जाळे बळकटीकरण व वीज वितरणप्रणाली अधिक सुदृढ करणे इत्यादी कामे प्रगतिपथावर आहेत. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्याकरिता आढावा बैठक पार पडली.

या वेळी चालू व भविष्यातील प्रस्तावित योजना, विद्युतपुरवठा स्थितीबद्दलही आढावा घेऊन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

# रोहा सिलिंडर स्फोट घटनेतील लेकीपाठोपाठ वडिलांचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याच्या वरसे ग्रामपंचायत हद्दीतील भुवनेश्वर येथे राहणारे मनोहर घोसाळकर यांच्या घरी १३ नोव्हेंबरला सिलिंडरचा स्फोट झाला होता. या अनपेक्षित घटनेत कुटुंबातील तीन सदस्य गंभीर जखमी झाले. यातील जखमी तरुणीचा मुंबईत हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर आता तिच्या वडिलांचीही प्राणज्योत मालवली आहे.




दिवाळीच्या तोंडावर रोहा तालुक्यातील वरसे ग्रामपंचायत हद्दीतील भुवनेश्वर कालवा रोड येथे राहणारे मनोहर घोसाळकर यांच्या घरी सिलिंडरचा स्फोट झाल्याची घटना घडली होती. या सिलिंडर स्फोटात मनोहर घोसाळकर, सायली घोसाळकर, भावना घोसाळकर गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने मुंबई येथील केईएम हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. दरम्यान, आगीतील जखमी भावना घोसाळकर उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर भावनाचे वडील मनोहर घोसाळकर तब्बल १३ दिवस मृत्यूशी झुंज देत असताना अखेर त्यांचेही निधन झाले आहे. त्यामुळे वरसेसह रोह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

# कर्नाळा किल्ला, अभयारण्यात पर्यटकांची वाढती गर्दी







**पनवेल : वार्ताहर**

थंडीच्या मोसमात निसर्गाचा व ऐतिहासिक वास्तूचा आनंद घेण्यासाठी पनवेलजवळील कर्नाळा किल्ला व अभयारण्यात पर्यटकांची गर्दी दिवसागणिक वाढत चालली आहे. त्यामुळे परिसरातील व्यावसायिकांना सुगीचे दिवस आले आहेत.

कर्नाळा किल्ला व अभयारण्यास गतवर्षी ४० हजार २११ जणांनी भेट दिली होती. या वर्षी १० महिन्यांत तब्बल ५७ हजार ९८८ पर्यटकांनी भेट दिली आहे. ऐतिहासिक वारसा स्थळासह पक्षीनिरीक्षणाची संधी मिळत असल्याने मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पुणेसह राज्यातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे हजेरी लावतात.

पनवेलमधील प्रमुख पर्यटनस्थळांमध्ये कर्नाळा अभयारण्याचा समावेश होतो. कोरोनानंतर या परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी झाली होती, तर गतवर्षी पावसाळ्यात किल्ल्याचा भाग खचल्यामुळे किल्ल्यावर जाण्यास बंदी घातली होती. या किल्ल्याला इतिहासात विशेष महत्त्व आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा या किल्ल्याचे किल्लेदार होते. किल्ल्यावरील सुळका, खडकात खोदलेली तळी, पुरातन वास्तूंचे अवशेष, दरवाजा पाहण्यासारखा आहे.

या अभयारण्यात १३४ प्रकारचे स्थानिक व ३८ स्थलांतरीत पक्षी पहावयास मिळतात. ऑक्टोबर ते फेब्रुवारी ही पक्षीनिरीक्षणासाठी योग्य वेळ आहे. वनविभागाने सुविधा उपलब्ध केल्या आहेत. येथे शिपाई बुलबुल, लालबुड्या बुलबुल, टकाचोर, राखी कपाळाची हारोळी, नारंगी डोक्याचा कस्तूर, निळा माशीमार, बाकचोच सातभाई, रानपारवा, पाचू होला, माशीमार, कोकीळ, रान धोबी, पांढऱ्या गालाचा कटुरगा, कोतवाल, फुलटोच्या, टोई पोपट, राखी कोतवाल, वेडा राघू, चष्मेवाला, करडा धोबी, भांगपाडी मैना, दयाळ, टिटवी, हुदहुद, ठिपकेवाला पिंगळा, शिंपी, तुरेवाला सर्पगरूड, जांभळा शिंजीर, तिबोटी धिवर, नील कस्तूर, नील दयाळ व इतर पक्षी दिसून येतात.

राज्य, देशातील पर्यटकांसह विदेशी लोकसुद्धा कर्नाळा अभयारण्य व किल्ला पाहण्यासाठी आवर्जून भेट देतात. त्यामुळे या भागात असलेल्या व्यावसायिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.





**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी कॉलेज येथे राज्याचे पहिले मुख्यमंत्री व संस्थेचे माजी अध्यक्ष स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन ॲड.भगीरथ शिंदे, संघटक डॉ.अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव डॉ.ज्ञानदेव म्हस्के, डॉ.शिवलिंग मेनकुदळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे आणि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभेच्या कामासाठी आलो आहे. सुपर वॉरियर्स लोकांच्या घरी जाऊन पंतप्रधान मोदींचे कार्य समजावून सांगतील. ज्यांना योजनांचा लाभ मिळाला नाही त्यांना योजनेचा लाभ कसा देता येईल ते बघणार आहोत. सन २०२४ मध्ये नरेंद्र मोदी तिसऱ्या वेळा पंतप्रधान पदाची शपथ घेतील तसेच राज्यात महायुतीचे ४५ प्लस खासदार निवडून येतील, असा विश्वास भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.



आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने तयारी सुरू केली असून, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे राज्यातील अनेक ठिकाणी दौरे करत आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मकाऊ भेटीवरून संजय राऊतांनी टीका आणि आरोप केले. यावर बोलताना, वैयक्तिक जीवनात बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एका फोटोमुळे कुणाची इमेज खराब करता येते असे एखाद्याला वाटत असेल तर ते शक्य नाही. हाँगकाँगला परिवारासोबत गेलो होतो. त्या ठिकाणी प्रत्येक हॉटेलमध्ये कॅसिनो असतो, त्याला क्रॉस करून जाताना कुणीतरी तो फोटो काढला, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून पंकजा मुंडे नाराज असल्याच्या चर्चांनी पुन्हा एकदा जोर धरला आहे. यावर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. पंकजा मुंडे कुठेही नाराज नाहीत. पंकजा मुडे यांच्या नेतृत्वाला कुठल्या ना कुठल्या माध्यमातून जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यांच्या नाराजीने विरोधकांचा काही फायदा होईल असे अनेकांना वाटते, पण पंकजाताईंच्या रक्तारक्तात भाजप आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या कर्तृत्वाने उभा राहिलेला महाराष्ट्रात पंकजाताई कधीही नाराज राहू शकत नाहीत. खरेतर पक्ष मोठा आहे. पंकजाताई पक्षाच्या राष्ट्रीय सचिव आहेत. निश्चितपणे पंकजा ताई महाराष्ट्रात आणि देशात चांगल्या लेव्हलला नेतृत्व करतील अशी अपेक्षा आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टपणे सांगितले.

दरम्यान, वाचळवीरांनी औकतीत बोलावे, महाराष्ट्र संस्कारमय आहे, देव, देश, धर्म संस्कृती जपणारा आहे. इतर काही बोलण्यापेक्षा राज्याच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचविण्यासाठी बोलले पाहिजे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. तसेच ५२७ वर्षांपासून राम मंदिराची वाट पाहिली जात आहे. ते स्वप्न पूर्ण झाले. मुस्लिम माहिलाही भाजपला मतदान करणार आहेत. याचे कारण त्यांचा संसार वाचवण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले आहे. महिला आनंदी आहेत, नवीन संसद भावनात पहिला कायदा महिलांना आरक्षण देण्याचे काम केले, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## ठाण्यात आगीमध्ये दोघांचा मृत्यू

**ठाणे** : बंगल्याच्या पहिल्या मजल्यावर लागलेल्या आगीचा धूर दुसऱ्या मजल्यावरील खोलीत जाऊन त्या ठिकाणी झोपलेल्या दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ठाण्याच्या घोडबंदर परिसरातील वाघबीळ भागात शनिवारी (दि.२५) पहाटे घडली, तर तिघे सुखरूप बाहेर आल्याने त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

ठाण्यातील वाघबीळ भागात असलेल्या मढवी निवास या बंगल्याच्या पहिल्या मजल्यावर आग लागल्याची घटना पहाटे घडली. या वेळी बंगल्यात एकाच परिवारातील पाच जण अडकले होते. त्यापैकी तीन जण सुखरूप आगीतून बाहेर पडले, तर घरातील दोन जणांना आगीचा त्रास होऊ लागल्याने ते बेशुद्ध पडले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी दोघांना आगीतून बाहेर काढून नजीकच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. अभिमन्यू मढवी (वय ६०) आणि रमाबाई मढवी (वय ५५) अशी मृत पावलेल्या दोघांची नावे आहेत.

## कर्जतमध्ये ओबीसी संघटना एकवटल्या

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ओबीसी संघटनांची एक संयुक्त बैठक कर्जत तालुका आगरी समाज संघटनेने पुढाकार घेऊन आयोजित केली होती. या वेळी तालुक्यातील ओबीसी संघटनांनी एकत्र येत आपल्या आरक्षणावर अन्य कोणाचेही अतिक्रमण नको, असा पवित्रा घेतला.

नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात झालेल्या या बैठकीस तालुक्यातील ओबीसी श्रेणीमधील अनेक जातींचे प्रतिनिधी उपस्थित होते. ओबीसी जाती वर्गातील सर्व समाज आणि सकल मराठा समाज यांनी एकत्र बसून किमान कर्जत तालुक्यात या दोन्ही समाजात दुही निर्माण होऊन वातावरण दूषित होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी सभेचे अध्यक्ष म्हणून कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष सुरेश टोकरे होते, तर सभेला भटक्या विमुक्त जातीचे राष्ट्रीय पदाधिकारी भगवान चव्हाण तसेच सावळाराम जाधव, वसंत कोळंबे, भगवान चव्हाण, अनिल जोशी, दिलीप शिंदे, मनोज मानकामे, केतन पोतदार, सुशांत बदले हे विविध जातींचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत आगरी, नाभिक, शिंपी, लोहार, सोनार या समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी या सर्व समाजाच्या प्रमुखांनी राज्यात सुरु असलेल्या आरक्षणाबाबत आपली रोखठोक भूमिका मांडत ओबीसी परिषद आयोजित करण्याची सूचना केली, तर ओबीसींमधील सर्व जातींची जनगणना व्हावी, अशीदेखील मागणी करण्यात आली. काही पदाधिकाऱ्यांनी केवळ आगरी समाजाने नाही, तर तालुक्यातील ओबीसी समाजातील सर्व जातींच्या संघटनांनी अशा बैठका घेऊन सर्व ओबीसी समाजाला एकत्र आणण्याचे प्रयत्न करावेत, अशी सूचना केली. त्याचवेळी तालुक्यात विभागवार बैठका घेण्याची सूचना करताना आणि तालुक्यातील ओबीसी आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी आपले नेतृत्व निश्चित करण्यात यावेत, असे सूचित करण्यात आले.

या वेळी भटक्या विमुक्त मोर्चाचे राष्ट्रीय सचिव भगवान चव्हाण यांनी, मराठा समाजाला सरकारने आरक्षण द्यावे आम्ही त्याचे स्वागत करतो, मात्र त्यांना ओबीसी कॅटेगरीत आरक्षण देऊ नये, असे आवाहन केले.

कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे संचालक संतोष पेरणे यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सर्वात आधी शासनाला देण्याची सूचना केली. त्यानंतर मराठा आणि आगरी हे कर्जत तालुक्यातील मोठे समाज असून प्रामुख्याने या समाजात आरक्षणाच्या मुद्द्यावर दुही निर्माण होणार नाही अशी काळजी घेण्याचे आवाहन केले.



(छाया : विजय मांडे)

## महापारेषणमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.



सुरूवातीला महापारेषणचे संचालक (वित्त) अशोक फळणीकर यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) मंगेश शिंदे, मुख्य विधी सल्लागार डॉ. किर्ती कुळकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) नितीन कांबळे, अभय रोही, अधीक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण, सचिन खडगी, उपमुख्य दक्षता अधिकारी प्रशांत गोरडे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## चौक बाजारपेठेतील तुपगाव कॉर्नर धोकादायक

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठ मधून तुपगावकडे जाणारा रस्ता म्हणजे तुपगाव कॉर्नर धोकादायक असुन येथे भाजीपाला विक्रीस बसणारे यांच्या जीवावर बेतू शकतो, रोजच अशी स्थिती होत असली तरी त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही.



खालापूर तालुक्यातील चौक हि मोठी बाजारपेठ असून चाळीस गावातून लोक याठिकाणी खरेदी विक्री साठी ये-जा करीत असतात. या परिसरात गावठी भाजीपाला मोठ्या प्रमाणावर पिकवला जातो. त्याचप्रमाणे त्याची विक्री देखील जास्त प्रमाणत होत असते, गावठी भाजीपाला विक्री करणारे सामान्य शेतकरी व आदिवासी महिला असतात. यांना भाजीपाला विक्रीसाठी जागा उपलब्ध नसल्याने रस्त्याच्या दुतर्फा ते बसतात, तुपगाव कॉर्नर हा परिसराला जोडणारा भाग आहे, त्यामुळे येथे जास्त लोक विक्रीस बसतात. चौक गावातून तुपगाव कडे व तुपगाव येथुन चौक मार्गे पनवेल - खोपोलीकडे जाणाऱ्या गाड्या अनधिकृत बांधकाम, विद्युत खांब, बेशिस्त दुचाकी पार्किंग, रिक्षा स्टँडला जागा नसल्याने त्यांची स्थिती वाईट अशा अनेक कारणांनी हे भाजी विक्रेते रस्त्याच्या कडेला बसल्याने दोन्ही बाजूला गाड्या जाताना, गाड्यांची मागील बाजूस ही बसलेल्या लोकांच्या अगदी कडेने जाते, अनेक वेळा भाजी विक्रेते आपल्या पाट्या मागे ओढताना दिसतात, कधीतरी ते जीवावर बेतले जाऊ शकते, हे नेहमीच चित्र दिसत आहे. वेळीच उपाय न झाल्यास कुणाला तरी आपला जीव गमवावा लागेल, तरच प्रशासनाला जाग येईल.

# वाचन सुलभता वाढविण्यासाठी अधिकाधिक पुस्तकांचे डिजिटायझेशन करावे : राज्यपाल

## एशियाटिक सोसायटीचा वर्धापन दिन



**मुंबई : प्रतिनिधी**

नवी पिढी वाचनापासून दूर जात आहे हा चुकीचा समज आहे. डिजिटल माध्यमे आल्यामुळे नवी पिढी वाचन सुलभता शोधत आहे. व्यापार सुलभतेप्रमाणेच वाचकांना वाचन सुलभता हवी आहे. ग्रंथ वाचन बंद झाले नाही, तर वाचण्याची पद्धत बदलली आहे. त्यामुळे ग्रंथालयांनी अधिकाधिक पुस्तकांचे डिजिटलायझेशन करावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी शनिवारी (दि. २५) येथे केले.

मुंबईचे सांस्कृतिक वैभव असलेल्या एशियाटिक सोसायटीचा २१९वा वर्धापन दिवस राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत सोसायटीच्या सभागृहात झाला. त्या वेळी ते बोलत होते.

लाखो दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, नाणी व नकाशांचा संग्रह असलेली एशियाटिक सोसायटी आपल्या अस्तित्वासाठी लढताना दिसत आहे, परंतु मुंबई हे दानशूर लोकांचे शहर आहे. मुंबई मॅरेथॉनच्या माध्यमातून शेकडो अशासकीय संस्था आपल्या सेवाभावी कार्यांसाठी मुंबईतून निधी संकलन करीत असतात. त्यामुळे निधीची कमी नाही, तर योग्य व्यक्तींकडे योग्य प्रस्तावासह पोहोचणे आवश्यक असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

एशियाटिक सोसायटीने राज्यातील सर्व विद्यापीठांसोबत काम करावे, आपल्या भव्य जागेची पुनर्रआखणी करावी व युवा वाचकांना आकृष्ट करावे असे राज्यपालांनी सांगितले. जगातील मोठमोठी ग्रंथालये स्वतःला कसे बदलत आहेत याचे अध्ययन करून आपण त्यानुसार बदल करावे तसेच युवा पिढीला व कॉर्पोरेट सदस्यांना व्यवस्थापनात घ्यावे, अशी सूचना राज्यपालांनी या वेळी केली.

एशियाटिक सोसायटीला अध्यक्ष म्हणून इतिहासकार, लेखक व संपादकांची परंपरा लाभली आहे. सोसायटीने स्वतःचा वार्षिक साहित्य उत्सव निर्माण करावा. संगीत समारोहाचेदेखील आयोजन करावे. अनेक देश आज आपल्या देशातील ऐतिहासिक वारशाच्या माध्यमातून पैसे कमवत आहेत. एशियाटिक सोसायटीने आपले कार्य सुरू ठेवण्यासाठी आपले स्थापत्य व ग्रंथ वैभव जगापुढे आणावे, अशी सूचना राज्यपालांनी केली.

या वेळी डॉ.सरयू दोशी (भारतीय कला, इतिहास व संस्कृती), डॉ.अनुरा मानातुंगा (लेखक व क्युरेटर, कला इतिहास), प्रो. नोबुयोशी नामाबे (बुद्धिस्ट स्टडीज), प्रो गोपाल कृष्ण कान्हेरे (रौप्यपदक) व प्रो. ब्रजकिशोर स्वैन (धर्मशास्त्र महामहोपाध्याय डॉ पां. वा. काणे सुवर्णपदक) यांना राज्यपालांच्या हस्ते संस्थेची फेलोशिप व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. संगीतकार झुबीन मेहता, प्रो उपिंदर सिंग व प्रो सुभाष चंद्र मलिक उपस्थित राहू शकले नाहीत.

सोसायटीच्या अध्यक्ष विस्पी बालापोरिया यांनी प्रास्ताविक केले, तर मानद सचिव मंगला सरदेशपांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाला छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे महासंचालक डॉ. सब्यसाची मुखर्जी, सोसायटीच्या उपाध्यक्ष शहरनाज नलवाला, डॉ फरोख उदवाडिया आदी उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी

**विटा (सांगली) : प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ता वीरू फाळके यांच्या नेतृत्वाखाली सांगलीतील विटा ते मुंबईतील आझाद मैदान अशी भारतरत्न पदयात्रा काढण्यात आली आहे.

या यात्रेत अमीर मुलानी, रोहन सकट, अजय सकट, प्रथमेश फाळके, मल्हारी सकट, अनिकेत बनसोडे यांच्यासह मोठ्या संख्येने तरुण-तरुणी सहभागी होत आहेत. गावागावात यात्रेचे स्वागत होत आहे.

भाऊ साठे यांचे कार्य समजून घेत त्यांना भारतरत्न पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करावे, अशी पदयात्रींची मागणी आहे.



## महाडमध्ये घरफोडी

**महाड : प्रतिनिधी**

चांभारखिंड हद्दीत शुक्रवारी (दि. २४) दुपारी एका बंद फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी एकूण सहा लाख २१ हजार किमतीचा माळ चोरला आहे.

स्वप्नाली अनंत शिंदे (रा. रूम १०४, पहिला मजला, हायवे प्लाझा, महाड) यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार तीन महिन्यांपासून त्यांच्या फ्लॅटचे अंतर्गत दुरुस्तीचे काम चालू असल्याकारणाने फिर्यादी हे याच इमारतीमधील वरच्या मजल्यावर त्यांच्या दुसऱ्या फ्लॅटमध्ये राहत होत्या. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्यांनी फ्लॅटचे टाळा फोडून आत प्रवेश करत घरातील तीन लाख रोख रक्कम आणि तीन लाख २१ हजारांचे सोन्या चांदीचे दागिने एकूण सहा लाख एकवीस हजाराची चोरी केली आहे. इमारतीच्या सीसीटीव्हीत दिसणाऱ्या तीन अज्ञात चोरट्यांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

# ठाणे जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेचा दिमाखात शुभारंभ

## शासकीय अधिकारी-कर्मचारी अन् नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ शनिवार (दि. २५)पासून अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झाला.



भिवंडी तालुक्यातील अस्नोली ग्रामपंचायत क्षेत्रातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथील विकसित भारत संकल्प यात्रेच्या शुभारंभावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे, भिवंडी प्रांताधिकारी अमित सानप, विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने, जिल्हा कृषी अधीक्षक दीपक कुटे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, इतर शासकीय विभागांचे अधिकारी, शासकीय लाभार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील कार्यक्रमाचे गटविकास अधिकारी प्रदीप घोरपडे यांनी अतिशय उत्तम नियोजन केले होते.

आजच्या या शुभारंभ कार्यक्रमाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे यांनी उपस्थितांना आवाहन केले की, या विकसित संकल्प यात्रेच्या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध शासकीय योजनांची माहिती देणाऱ्या स्टॉलची उभारणी, आरोग्य शिबिर, सिकलसेल व क्षयरोग तपासणी व औषधोपचार शिबिर उज्वला योजनेची नोंदणी व लाभार्थ्यांना लाभ, आरसीएफ कंपनीतर्फे ड्रोन च्या माध्यमातून कीटकनाशक फवारणी प्रात्यक्षिक असे विविध उपक्रम राबविण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ लक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने ही विकसित भारत संकल्प २४ जानेवारी २०२४पर्यंत सुरू राहणार आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या डिजिटल स्क्रीन असलेल्या व्हॅन सज्ज करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या नीती आयोगाच्या संचालक जागृती सिंगला, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### दत्तात्रेय दांडेकर



**मोहोपाडा, रसायनी :** आपटा गावातील दत्तात्रेय मधुसुदन दांडेकर (वय ८१) यांचे निधन झाले. ते रसायनी येथील केंद्र सरकारच्या हिंदुस्थान ऑरगॅनिक लिमिटेड एचओशी कंपनीचे माजी कर्मचारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन मुले आहेत. रसायनी परिसरासह आपटा गावात व आसपासच्या परिसरात ते दादा दांडेकर म्हणून प्रसिद्ध होते.

### प्रकाश पायगुडे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे दोन बंधू असा परिवार आहे. पायगुडे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह, प्रमुख कार्यवाह आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यवाह म्हणून काम पाहिले. त्यांनी क्रीडा समालोचक म्हणून ही जबाबदारी पार पाडली. अनेक वृत्तपत्रात आणि मासिकात त्यांनी सदर लेखन केले. अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या कार्यकारी मंडळाचे ते सदस्य होते.

# उरणकरांना नववर्षात 'रो-रो' भेट

- मोरा-मुंबई जलसेवा होणार सुरू
- मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांचा दावा



**उरण : प्रतिनिधी**

मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या मार्गावरील रो रो जलसेवेच्या मोरा जेट्टीचे काम मागील सहा महिन्यांपासून बंद आहे. मात्र असे असले तरी लवकरच या रो-रोच्या कामाला सुरुवात करून जुलै २०२४च्या निश्चित वेळी मार्ग सुरू होईल, असा दावा महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.

२०१८ला मंजूर झालेल्या मोरा-उरण ते मुंबई भाऊचा धक्का दरम्यानच्या रो रो सेवेचे काम निधी अभावी रखडले आहे. मागील सहा महिन्यांपासून या जेट्टीवर एकही दगड पडलेला नाही, मात्र जेट्टीचे काम लवकरच सुरू करण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. उरणमधील नागरीकांसाठी आपल्या खाजगी वाहनांसह मुंबईत ये जा करता यावे या करीता मोरा ते मुंबई रो-रो सेवा सुरू करण्यात येणार आहे. या जलसेवेच्या कामाला सुरुवात झाली आहे.

या जलमार्गाचे काम अनेक वर्षे रखडल्याने या कामाचा अंदाजित ५० कोटींचा खर्च वाढून ७५ कोटीवर पोहचला आहे. मोरा पोलिस ठाणे नजीक जेट्टीचे काम सुरू असून दगडांचा भराव करून जेट्टी बांधण्यात येत आहे. उरण वरून मुंबईत ये जा करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या रो-रो जेट्टीच्या कामाला आधीच विलंब झाला आहे. त्यामुळे ही सेवा कधी सुरू होणार असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. रो-रो सेवेचे काम बंद झाले नसून जेट्टीचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला बील न दिल्याने तसेच मध्यंतरी दगड खाण बंदीमुळे काम थांबले होते.

कंत्राटदाराला त्याचे बील देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा जेट्टीचे काम सुरू करण्यात येईल व २०२४ च्या निश्चित केलेल्या वेळेत पूर्ण होईल, अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.

### उत्तम प्रवासाची सोय लवकरच उपलब्ध

**उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानच्या रो-रो जलप्रवासात उरणच्या नागरिकांना आपले चार व दुचाकी वाहन घेऊन मुंबईत जाता येणार आहे. त्यामुळे वाहनासह उत्तम प्रवासाची सोय उपलब्ध होणार आहे.**

## पोलीस असल्याचे सांगून लुटणारा सराईत गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कसळखंड येथील एका पान टपरीवाल्यास आपण क्राईम ब्रांच पोलीस असल्याची बतावणी करून एक लाख ४९ हजार रुपये किमतीचा ऐवज लुटणारा सराईत गुन्हेगार पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे.

येथील नवकार कंपनीच्या गेट समोर असणाऱ्या एका पान टपरीवाल्यास अज्ञात व्यक्तीने आपण क्राईम ब्रांच पोलीस असल्याची बतावणी करून प्रथम त्याच्या पान टपरीमध्ये प्रवेश करून तेथे असलेल्या गल्ल्यातील ७० हजार, रोख रक्कम जबरीने चोरून त्याच्यावर केस करून अटक करण्याची व मारहाण करण्याची धमकी दिली. त्यानंतर त्याला स्कूटीवर बसवून कोन गाव, पळस्पे फाटा व त्यानंतर टोल नाक्याजवळील ट्रक पार्किंगच्या जागेमध्ये त्याला नेऊन त्याच्या कडे हप्ता मागून त्याच्या मोबाईलमधून जबरदस्तीने पैसे ट्रान्सफर करण्यास सांगून त्याच्या कडील दोन मोबाईल फोन, मनगटी घड्याळ असा ऐवज काढून घेतला. त्याला धमकावून त्याला मारहाण करून एकूण जवळपास एक लाख ४९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल घेऊन तो पसार झाला होता.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात केल्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक संजय गळवे, हवालदार विजय देवरे, महेश धुमाळ, सुनील कुदळे, आकाश भगत आदींच्या पथकाने त्या भागातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गुप्तबातमीदाराच्या माहितीच्या आधारे मो. अल्ताफ. मो. अकीउल्ला खान (वय ४६, रा. धारावी) याला वाशी परिसरातून त्याने गुन्ह्यात वापरलेल्या गाडीसह पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# बीसीटी कॉलेज ऑफ लॉच्या विद्यार्थ्यांची पॅरा लीगल स्वयंसेवक म्हणून निवड

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

एका उल्लेखनीय कामगिरीमध्ये, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉच्या विद्यार्थ्यांची जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांनी आयोजित केलेल्या सर्वसमावेशक प्रशिक्षण सत्रानंतर पॅरा लीगल स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.

शुक्रवारी (दि. २४) अलिबाग जिल्हा न्यायालयात आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्राने पॅरा लीगल व्हॉलिंटियर्सच्या बहुआयामी जबाबदाऱ्यांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान केली. विद्यार्थ्यांनी कायदेशीर प्रक्रिया, सामुदायिक प्रतिबद्धता आणि न्याय मिळवून देण्यासाठी ते बजावत असलेली महत्त्वाची भूमिका जाणून घेतली. कठोर प्रशिक्षण सत्रांनी सहभागींना प्रभावी समुदाय सेवेसाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये सुसज्ज केली.




प्रशिक्षणास उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अंजुम देशमुख-एलएलएम दुसरे वर्ष, राजश्री भुजबळ-एलएलएम पहिले वर्ष, स्नेहा साळवे-एलएलएम पहिले वर्ष, प्रशांत पाटेकर-एलएलबी दुसरे वर्ष, भुवनेश्वरी नायडू-एलएलबी दुसरे वर्ष प्रशांत पाटेकर आणि भुवनेश्वरी नायडू, दोघेही एलएलबी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची पॅरा लीगल स्वयंसेवक म्हणून सेवा करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांची निवड त्यांचे समर्पण, शैक्षणिक प्रवीणता आणि समुदाय सेवेची वचनबद्धता दर्शवते. या विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सहाय्य समितीच्या प्रभारी सहायक प्राध्यापिका धनश्री कदम यांच्या अथक परिश्रमाला जाते. अलिबाग येथील सत्रात विद्यार्थ्यांची उपस्थिती सुरळीत करण्यात सहायक प्राध्यापक सागर देवघरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड, प्रशिक्षण सत्रात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा उत्साह आणि समर्पण ओळखून त्यांचे कौतुक करते. निवडलेले पॅरा लीगल स्वयंसेवक, प्रशांत पाटेकर आणि भुवनेश्वरी नायडू, समाजासाठी योगदान देण्यासाठी आणि न्याय मूल्यांचे समर्थन करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील अशी अपेक्षा आहे.

हा उपक्रम सक्रियपणे सामुदायिक सेवेत गुंतलेले सामाजिक जबाबदार कायदेशीर व्यावसायिक तयार करण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेशी अखंडपणे संरेखित करतो.

## उरण नगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियान

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

शहरांमध्ये फक्त सुशोभिकरणच नव्हे तर सातत्याने स्वच्छताही आवश्यक आहे. प्रशासनाने शहरांच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील विविध नगरपालिका क्षेत्रात दर महिन्याला स्वच्छता अभियान राबविण्यात येते. मागील महिन्याप्रमाणे शुक्रवारी (दि. २४) उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

अभियानात तहसील कार्यालय परिसर ते मशीद मोहल्ला ते महात्मा गांधी पुतळा ते हरीपांडव पथपर्यंत परिसरात स्वछता अभियान घेण्यात आले. एकूण तीन टन कचरा उचलण्यात आला. या अभियानात मुख्याधिकारी राहुल इंगळे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, प्रशाशकीय अधिकारी अनिल जगधानी, कर निरीक्षक संजय डापसे यांनीही सहभाग घेतला, तसेच नगर परिषद शाळा क्र. १,२,३च्या शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी श्रमदान केले.





## घरोघरी लग्न सोहळे

**उरण : रामप्रहर वृत्त**

हिंदू पंचागांनुसार कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील द्वादशीला तुळशी विवाह केला जातो. या दिवसापासून तुळशीच्या लग्नाला सुरुवात होते. यंदा २४ नोव्हेंबरपासून तुळशी विवाहाला सुरवात झाली आहे. त्यामुळे उरणमधील शहरी तसेच ग्रामीण भागात या विवाहाची धामधूम पाहायला मिळत आहे.

ग्रामीण भागात घरासमोरील अंगणात तुळशी वृंदावनाजवळ शेजारी व आप्तस्वकीयांना घेऊन लग्न लावले जाते. लग्न लागल्यावर शेवबुंदीचा प्रसाद वाटला जातो. त्यामुळे वेगळाच उत्साह पाहायला मिळत आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विविध आंतरशालेय स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात स्व. जनार्दन भगत यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. ३०) सकाळी १० वाजता वेगवेगळ्या आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन केले आहे. या

स्पर्धांमध्ये प्रामुख्याने आंतरशालेय शास्त्र व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा व निबंध लेखन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या सर्व स्पर्धांसाठी वेगवेगळे विषय स्पर्धकांना देण्यात येणार आहेत त्यामधील प्रमुख विषय हा रायगड जिल्ह्यातील भूमिपुत्रांच्या उन्नतीसाठी स्व. जनार्दन भगतसाहेब यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान आहे.

या स्पर्धांसाठी नवी मुंबईमधील सर्व उच्च माध्यमिक महाविद्यालयाला निमंत्रण देण्यात आले आहेत. या स्पर्धांसाठी स्पर्धकांना पार्टिसिपेशन सर्टिफिकेट देण्यात येणार आहे तसेच रोख रकमेची बक्षिसेही देण्यात येणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे (समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांनी सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांना

या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्व स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत.

## खारघरमध्ये आज हृदयविकारावर व्याख्यान

**खारघर :** संविधान दिनाचे औचित्य साधून भाजप खारघर व कोकण रहिवाशी संघ यांनी हृदय विकारावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.तरुणांमध्ये हृदय विकाराचे प्रमाण वाढत आहे ही भीषणता लक्षात घेऊन भाजप खारघर व कोकण रहिवाशी संघ यांच्या वतीने यावर जनजागृती सुरू केली आहे. हृदय विकाराची लक्षणे, काळजी व उपचार यावर ज्येष्ठ हृदयतज्ञ डॉ. केशव काळे यांचे तर हाडांची झीज लवकर का होत आहे? यावर नामांकित ऑर्थोपेडिक डॉ. नितीश अरोरा यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. खारघर, पनवेल व नवी मुंबईतील नागरिकांनी या आरोग्य विषयक व्याख्यानाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जनता पक्ष, खारघर मंडलाचे महासचिव दीपक शिंदे यांनी केले आहे.

# शहीद दौड उपक्रमाचे पळस्पे पोलीस चौकी येथे स्वागत

**पनवेल : वार्ताहर**

२६/११ रोजी झालेल्या भ्याड हल्याचा निषेध करण्यासाठी तसेच या हल्ल्यात शहिद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अशोक कामटे स्मृती फाऊंडेशनच्या माध्यमातून दरवर्षी सांगली ते गेट वे ऑफ इंडिया पर्यंत शहिद दौड आयोजित करण्यात येते. त्याअंतर्गत यंदाच्या वर्षी आयोजीत करण्यात आलेल्या दौडचे पनवेलमध्ये आगमन झाले असून त्यांचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने पळस्पे पोलीस चौकी येथे स्वागत करण्यात आले.

परिमंडळ २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्वागत कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे यांनी आयोजन केले होते. या वेळी अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजक श्रीकांत कुंभार, योगेश रोकडे, निलेश मिसाळ, घनश्याम डंके व त्यांच्या तीस जणांच्या पथकाचे पळस्पे येथे या दौडचे स्वागत केले.

२६ नोव्हेंबर २००८ साली झालेल्या भ्याड हल्ल्यामुळे अनेक वरिष्ठ अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच निष्पाप नागरिक शहीद झाले होते. या भ्याड हल्याचा निषेध करुन श्रद्धांजली वाहण्यासाठी २००९ साला पासून अशोक कामटे स्मृती फाऊंडेशनच्या माध्यमातून सांगली ने मुंबई गेट वे ऑफ इंडिया पर्यंत शहिद दौड आयोजित करण्यात येते. ४७० किलोमीटरची हि दौड असते यात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतात आणि या दौड च्या माध्यमातून देशद्रोहींना संदेश देतात की, तुम्ही पुन्हा हल्याचा प्रयत्न कला तर २००० किलोमीटर आत घुसून तुम्हाला नेस्तानाबूद करू हा इशारा देण्यात येतो.

या वेळी परिमंडळ २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी सांगितले की, आजची तरुण पिढी अश्या प्रकारच्या उपक्रमामध्ये सहभागी होत असल्याने त्यांचा जोश उत्साह वाढविण्याचे काम प्रत्येकाचे कर्तव्य आहे. तर या वेळी वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी सांगितले की, २६/११ रोजी झालेल्या हल्ल्याच्या वेळेस मी स्वतः तिथे उपस्थित होतो सलग चार दिवस तेथे कर्तव्य बजावीत असतांना वेगवेगळ्या घटना, हल्ले स्वतः अनुभवले आहे. या हल्ल्यामुळे अनेक जण शहीद झाले परंतु अश्या प्रकारचे धाडस यापुढे कुठलाही देश यापुढे करणार नाही हे आपण जगाला दाखवून दिले आहे.

आयोजक श्रीकांत कुंभार यांनी सुद्धा आजची तरुण पिढी देश प्रेम सर्वात प्रथम बघते हे दिसून येते. आज आमच्या अकादमी मध्ये इयत्ता दहावी पासून उच्च शिक्षित मुले सहभागी झाले असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांसह यांच्यासह पळस्पे पोलीस चौकीचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.








## श्रीराम मंदिरात अन्नकोट उत्सव



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील श्रीराम मंदिर ट्रस्ट, गणपती चौक उरण शहर येथे श्रीराम मंदिरात अन्नकोट उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अन्नकोट म्हणजे विविध पदार्थ तयार करून ते देवाला नैवेद्य दाखविणे होय. देव दिवाळी सणाच्या मुहूर्तावर अन्न कोटचे आयोजन अनेक ठिकाणी करण्यात येते. उरण शहरातील गणपती चौकातील श्रीराम मंदिरात १५० हुन अधिक पदार्थ अन्न कोट उत्सवावेळी ठेवण्यात आले होते. या पदार्थांचा नैवेद्य देवाला अर्पण करण्यात आला. या वेळी श्रीराम मंदिर ट्रस्ट, गणपती चौक उरणचे पदाधिकारी सदस्य, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरती झाल्या नंतर, देवाला नैवेद्य अर्पण केल्यानंतर ते पदार्थ प्रसाद म्हणून भाविक भक्तांना वाटण्यात आले. गेली २५ वर्षाहून जास्त वर्षे ही परंपरा चालू असून अन्नकोट उत्सवला हिंदू धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीराम मंदिरात अन्नकोट उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.


# लांबीचे काय हो? पिक्चरची खोली महत्त्वाची!


झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक











पिक्चरवाल्यांना वादविवादासाठी काहीही चालतं. आणि एकदा का वादाला तोंड फुटलं की फिल्मवाले, गॉसिप्सवाले त्यात काय काय, कुठून कशी भर घालतील काही सांगता येत नाही. काय तर म्हणे, संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'अनिमल' एकाच मध्यंतरचा असावा की दोन? का तर म्हणे, त्याची लांबी तीन तास एकवीस मिनिटे म्हणजेच एकशेएक्याण्णव मिनिटे इतकी आहे. जुन्या रिळाच्या हिशोबात वीस रिळे होतात.

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५)ची लांबी तीन तास चोवीस मिनिटांची असूनही 'विना तक्रार, विना कंटाळा' अनेकांनी अक्षरश: पुन्हा पुन्हा पाहत. काहीजण आजही एकाद्या उपग्रह वाहिनीवर (जाहिरातींसह चार तास) अथवा यू ट्यूबवर पुन्हा पुन्हा 'शोले' पाहतात. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील अनेक वैशिष्ट्यांतील एक म्हणजे एकदा आवडलेला पिक्चर पुन्हा पुन्हा पाहणे. मग त्याची लांबी कितीही का असेना? आवडलेल्या पिक्चरसाठी कितीही वेळ देण्याची आपल्या पब्लिकची मानसिक तयारी असते.

'शोले' आणि 'निमल' या चित्रपटात काळाचा खूपच मोठा फरक आहे. 'शोले' तसा आजही विविध पद्धतीने सुरूच आहे. त्याचा फर्स्ट रन अर्थात सत्तरच्या दशकात सेन्सॉर सर्टिफिकेटवर अठरा, एकोणीस रिळ असं वाचलं रे वाचलं की हाऊसफुल्ल थेटरात टाळ्या शिट्ट्यांचा जणू पाऊस पडे. नेहमीच्या तिकीटात जास्त पिक्चर पाहायला मिळणार असाच तो जणू आनंद असे. मल्टिप्लेक्स युगात एकशेसाठ मिनिटांचा चित्रपट म्हणजे दिग्दर्शकाने जणू एकादी गोष्ट मांडताना जास्त वेळ घेतल्याची मुव्ही लव्हर्सची भावना, पण खरंच तसं असते काय? दिग्दर्शक आशुतोष गोवारीकरच्या 'जोधा अकबर'ची लांबी दोनशे चौदा मिनिटे होती आणि त्यावरून चित्रपटसृष्टीत व मीडियात 'फार लांबी आहे' अशी कुजबुज, कुरकूर झाली. त्याच वेळेस आशुतोष गोवारीकरची एका फिल्मी मुहूर्तात भेट झाली असता तो मला म्हणाला, एखादी गोष्ट तपशीलवार आणि रंगवून सांगितली की ती अधिक प्रभावी ठरते. समोरच्यापर्यंत पोहचते. त्यामुळे ती तशीच मांडायला हवी. आशुतोष गोवारीकरच्या या म्हणण्याशी मी सहमत झालो. त्यानेच दिग्दर्शित केलेल्या 'लगान'ची लांबी दोनशे चोवीस मिनिटे आहे. त्याच्या थीमनुसार ते परफेक्ट होते. मध्यंतरानंतर क्रिकेट सामन्यातून चित्रपट आकार घेत घेत जातो, त्यासाठी भुवन (आमिर खान) खेडूतांमधून अतिशय कष्टाने क्रिकेट संघ तयार करतो आणि मग क्रिकेट शिकण्यापासून सांघिक भावना निर्माण करण्यापर्यंत बरेच काही चित्रपटात घडते आणि तब्बल दीड दोनशे वर्षांपूर्वीच्या खडूस इंग्लिश संघाचा पराभव करतो. हे सगळं अनेक छोट्या छोट्या गोष्टीतून पडद्यावर येत जाते म्हणजे वेळ लागणारच आणि चित्रपट रसिकांनी 'या चित्रपटातील क्रिकेटचा खेळ छान एन्जॉय केल्याने पिक्चर हिट झाला.' ऑस्करमध्ये विदेशी चित्रपट विभागात नामांकन मिळण्यातही ही लांबी कुठेच आडवी आली नाही. थीमनुसार चित्रपटाची लांबी असावी हा अलिखित नियमच. आशुतोष गोवारीकर 'व्हॉटस युवर राशी' या चित्रपटात दोनशे अकरा मिनिटात पकड घट्ट करु शकला नाही. याचं कारण एकच एखाद्या मालिकेचा विषय त्याने चित्रपटात साकारला. त्याच्या 'स्वदेश'ची दोनशेदहा मिनिटाची लांबी थीमनुसार परफेक्ट. आपल्या देशातील ग्रामीण भागातील वास्तव त्यात त्याने मांडले. तेथील जीवनाचा संथ वेग चित्रपटात आपोआप आला. येथे दिग्दर्शक दिसतो म्हणूया.

चित्रपटाच्या लांबीच्या या गोष्टीत आपल्या देशातील पहिल्या दोन मध्यंतरचा चित्रपट 'संगम' विशेष उल्लेखनीय. आर. के. फिल्म बॅनरचा हा पहिला रंगीत चित्रपट. राज कपूर दिग्दर्शित या चित्रपटात प्रेम त्रिकोणाची गोष्ट. दोन जिवलग मित्र (राज कपूर व राजेंद्रकुमार) एकाच युवतीच्या (वैजयंतीमाला) प्रेमात पडतात. त्यातला रोमान्स, समज गैरसमजातील नाट्य, गीत, संगीत व नृत्य यांच्या केमिस्ट्रीत भरपूर युरोप दर्शन. हा १९६४चा चित्रपट म्हणजे साठ वर्ष होताहेत. त्या काळात दोनशे अडतीस मिनिटांचा चित्रपट म्हणजे अबब इतका मोठा पिक्चर म्हणजे पटकथेत आणि दिग्दर्शनात तसे 'दाखवण्यासारखे' काही हवे. पब्लिक उगाच पडद्यावर डोळे लावून बसत नाहीत. मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील अप्सरा चित्रपटगृहाचे उदघाटन 'संगम'ने झाले. चित्रपटाच्या नियमित वेळा होत्या दुपारी अकरा, साडेतीन आणि रात्री आठ. आणि रसिकांनी दोन्ही मध्यंतर एन्जॉय केला. असा पहिलाच अनुभव म्हणून ते सुखावले.

या यशापासून जणू खुद्द राज कपूरचीच महत्त्वाकांक्षा जागी झाली आणि त्याने तब्बल सहा वर्ष खर्च करुन दोन मध्यंतरचा चित्रपट निर्माण केला. राज कपूरसारखे 'चित्रपट हाच आपला श्वास मानणारे दिग्दर्शक' चित्रपटाच्या लांबी वा रुंदीपेक्षा खोली महत्त्वाची मानत. चित्रपटाची खोली खूपच महत्त्वाची आहे, आपल्याला रसिकांचे मनोरंजन करायचयं हेच त्यांचे लक्ष.

सुरुवातीला म्हणजेच पहिल्या ट्रायलला या चित्रपटाची लांबी चार तास आणि ४३ मिनिटे (दोन मध्यंतर) अशी इतकी होती. हा चित्रपट प्रदर्शित करताना तो चार तास नऊ मिनिटे अर्थात दोनशे एकोणपन्नास मिनिटे (दोन मध्यंतर) अशा अवधीने पडद्यावर आला, पण फस्ट डे फर्स्ट शोपासूनच तो पडला पडला, बोअर है अशी जोरदार आवई उठली आणि मग त्याची लांबी कमी करुन ती १७८ मिनिटे (एक मध्यंतर) अशी करण्यात आली. तरीदेखील तीन तास. हा चित्रपट रसिकांना न आवडल्याने खरोखरच पडला की राज कपूरच्या व्यावसायिक शत्रूंनी तो पाडला याची आजही चर्चा सुरू आहे. हेदेखील एक प्रकारचे यशच. म्हणजेच मुद्रित माध्यम ते डिजिटल युग असा 'जोकर पडला की पाडला' अशी चर्चा सुरूच आहे. त्यावर 'फोकस' टाकला जात आहे. विशेष म्हणजे, यू ट्यूबवर मूळ दोन मध्यंतरचा म्हणजेच चार तास नऊ मिनिटे लांबीचा चित्रपट चक्क आहे.

आवर्जून पहा. रोमान्स आणि सर्कस, सेक्स आणि गीत संगीत यांचा छान मेळ घातलाय. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, आर.के. फिल्मच्या वतीने त्या काळातील नियमानुसार दहा वर्षांनी पुन्हा सेन्सॉर करण्यात आला असतानाच तो मूळ रूपातच सेन्सॉर करून घेतला आहे. आपल्या चित्रपटावरचे निस्सीम प्रेम, अभिमान आणि विश्वास असावा तर तो असा आणि अस्सल फिल्म दीवाने आवर्जून वेळ काढून मूळ 'मेरा नाम जोकर' अगदी आवर्जून यू ट्यूबवर पाहताहेत.

या चित्रपटाचे लेखन के. ए. अब्बास यांचे आहे तर शैलेन्द्र, हसरत जयपुरी, नीरज, प्रेम धवन, शैली शैलेन्द्र आणि इंदिवर यांच्या गीतांना शंकर जयकिशन यांचे संगीत आहे. जीना यहां मरना यहां इसके सिवा जाना कहां, कहता है जोकर सारा जमाना, जाने कहा गये वो दिन, ऐ भाई जरा देख के चलो, दाग न लग जाए ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. या चित्रपटात राज कपूर, मनोजकुमार, सिम्मी, अचला सचदेव, ऋषी कपूर, धर्मेंद्र, दारा सिंग, पद्मिनी, केईना रबिआनकिना, राजेंद्रकुमार, ओम प्रकाश, आगा, राजेन्द्रनाथ, सुंदर, मुक्री, मारुती, पोल्सन, फजल खान इत्यादींच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे मुंबईतील मेन थिएटर नॉव्हेल्टी होते. अतिशय दणदणीत पब्लिसिटीने हा चित्रपट प्रदर्शित झाला. इतक्या दणदणीत पब्लिसिटीने हा चित्रपट प्रदर्शित झाला की या चित्रपटापासून मुंबईतील 'बेस्ट' बसला या चित्रपटाच्या पोस्टरने रंगवले होते.

कालांतराने रणधीर कपूरने काही मुलाखतीत याच चित्रपटावरून त्याला प्रश्न करताच उत्तर दिले, आमच्या चित्रपट निर्मिती संस्थेचा सर्वाधिक यशस्वी 'मेरा नाम जोकर' आहे. म्हणजेच त्या चित्रपटाने रिपिट रन इत्यादीत रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळवला.

तात्पर्य, फर्स्ट रनला चित्रपट अपयशी ठरला म्हणजे त्याचा शो संपला, खेळ अर्धवट राहिला असे होत नाही, तर चित्रपट दर्जेदार असेल तर तो त्यानंतरही यश प्राप्त करीत असतो. चित्रपटाच्या जगाची ही गोष्ट अगदीच वेगळी म्हणायची.

चित्रपटाच्या लांबीच्या या गोष्टीत राजश्री प्रॉडक्सन्स निर्मित व सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन'ची लांबी दोनशे सहा मिनिटे इतकी. मला आठवतय, मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना लिबर्टी थिएटरची फर्स्ट डे फर्स्ट शोची तिकीटे दिली होती (संपूर्ण मुंबईत या एकाच चित्रपटगृहात प्रदर्शित करण्यामागे व्यावसायिक रणनीती होती.) 'गीत संगीत व नृत्यातून बोलणारा' हा चित्रपट एन्जॉय करीत असतानाच फर्स्ट इंटरमिशन असे पडद्यावर आले. म्हणजे हे पहिले मध्यंतर असून आणखी एक मध्यंतर आहे हे लक्षात आले आणि तासाभरात दुसरं मध्यंतर आले. पाचव्या दिवशीच थोडी लांबी कमी करून एक मध्यंतर केल्यावर चित्रपट आणखी प्रभावी ठरला आणि लिबर्टीती एकशेदोन आठवड्यांचा खणखणीत मुक्काम केला.

सुभाष घई दिग्दर्शित 'सौदागर'ही तब्बल दोनशे तेरा मिनिटांचा जबरदस्त मसालेदार मनोरंजक चित्रपट. अनेक व्यक्तिरेखा आणि मूळ कथानकात अनेक उपकथानके अशी त्यात सांगड. जनसामान्यांचे भरपेट मनोरंजन करण्याची जणू ही हौस मौज. जे.पी. दत्ता दिग्दर्शित 'एलओसी कारगिल'ची लांबी तब्बल दोनशे पंचावन्न मिनिटे इतकी. युद्धाची तयारी, युद्धाचा थरार यात चित्रपट थरारक झाला तरी दिग्दर्शक जे.पी. दत्तावर 'बॉर्डर'च्या यशाचा हॅन्गओव्हरच दिसला. रसिकांनी चित्रपट नाकारला.

दिग्दर्शक अनुराग कश्यपने 'गॅन्स ऑफ वासेपूर' अतिशय तपशीलवार साकारताना लांबीवर कोणतेच नियंत्रण ठेवले नाही. अनेक व्यक्तिरेखा आणि छोट्या छोट्या गोष्टीतून चित्रपट रंगवला. तो झाला तीनशे नऊ मिनिटांचा. म्हणजेच दोन मध्यंतर हवीत. त्यापेक्षा त्याने पहिला भाग आणि त्याचा सिक्वेल असे केले. रसिकांना ते आवडले हे जास्त महत्त्वाचे. एक प्रकारे एकच पूर्ण चित्रपट पाह्यला दोनदा तिकीट काढले म्हणायचे.

पिक्चरची लांबी प्रकरण दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपट हिंदीत डब होण्याच्या ट्रेण्डमध्येही कायम. जणू मूळ तमिळ वा तेलगू चित्रपट लांबीने मोठे तेवढेच मनोरंजन मोठे असं वातावरण. पहिला 'बाहुबली' आणि दुसरा 'बाहुबली' मिळून तब्बल तीनशे सतरा मिनिटांचा जबरदस्त फॅण्टसी ड्रामा. पडद्यावरच्या विश्वात रसिक रमून गेले. 'आरआरआर'ची लांबी एकशे एकोणनव्वद मिनिटे. थरारक क्शन आणि भरपूर व्हीएफएक्सने आपण या चित्रपटाला इतका वेळ कधी बरे दिला हे लक्षातच येत नाही. अधिकची लांबी एखाद्या चित्रपटाच्या पथ्यावरही पडते.

मोठ्या शहरांत हे लांबी प्रकरण यशस्वी ठरते. छोट्या शहरात आणि ग्रामीण भागात 'रिळांच्या युगात' या लांबीवर स्थानिक थिएटरवालाच कात्री चालवे. तेथे 'दिवसा चार खेळ' ही थिएटर संस्कृती. बारा, तीन, सहा व नऊ अशा 'फिक्स्ड वेळा'. त्यात बसेल तेवढाच पिक्चर आम्ही दाखवू असाच जणू रोखठोक बाणा. पब्लिकने मूळ चित्रपटातील काय कापलयं, काय ठेवलयं याची चिंता न करताच पिक्चर एन्जॉय केलीत. अनेक तालुक्यात वा गावांत रात्रीचा खेळ संपल्यावर रिक्षा/ सितारा/टमटम पकडायची घाई, ते कुठे हो जास्त लांबीचे पिक्चर पाहत बसणार?

लांबलचक पिक्चरच्या गोष्टी शहरापासून लांब लांब गेल्यावर बदलत जातात...

---

# एरंडोलमध्ये साकारतोय 'पुस्तकांचा बगीचा'











वनस्पतीचे गार्डन आपण पाहतो, फुलांचा बगीचा पाहिला असेल, पण एरंडोल नगर परिषदेने तब्बल ३३ गुठ्यांत पुस्तकाचा बगीचा साकारला आहे. वाचन संस्कृती वाढविण्याच्या दृष्टीने राज्यासाठी हा प्रयोग आदर्श ठरू शकणार आहे. राज्यातला अशा प्रकारचा पुस्तकांचा एकमेव बगीचा आहे हे विशेष!

वाचन संस्कृती टिकून राहावी, त्यात वाढ व्हावी या उद्देशाने एरंडोल नगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांच्या संकल्पनेतून शहरात पुस्तकांच्या बगीच्याची निर्मिती करण्यात आली आहे. हा बगीचा एरंडोल शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

शहरातील आनंद नगर भागात ३३ गुंठे म्हणजेच बीघा भर जागेत पुस्तकांचा बगीचा साकारला जातो आहे. या नाविन्यपूर्ण गार्डनमधे विविध प्रकारची पुस्तके उपलब्ध असणार आहेत. ठिकठिकाणी पुस्तकांचे बॉक्स आहेत. पुस्तक वाचनासाठी आठ वाचन कट्टे बांधले आहेत.

बगीच्यात पूर्णत: निसर्गरम्य वातावरणाची निर्मिती करण्यात आली आहे. गार्डनमधे प्रत्येक मोठ्या झाडाखाली पुस्तकाचा बॉक्स आहे. तेथून पुस्तक काढून तुम्हाला ते झाडाखाली बांधण्यात आलेल्या ओटच्यावर बसून पुस्तक वाचता येणार आहे.

या पुस्तकांच्या बगीच्यात ग्रीन लॉन व विविध सुगंधीत फुलझाड आहेत. त्यातून वातावरण सुगंधीमय होणार आहे. भिंतीवर विचारवंताचे पुस्तकात व्यक्त केलेले विचार चित्रीत करण्यात आले आहेत, तर ठिकठिकाणी कवितांचे पोर्ट्रेट करण्यात आले आहे. ग्रीन जीमचीही व्यवस्था करण्यात आली आहे. पुस्तक व वृक्ष यावर आधारित भितीचित्र रंगविण्यात आले आहे. कवयित्री बहीणाबाईच्या कवितेसह पुस्तकांचे भव्य शिल्प उभारण्यात आले आहे. याबरोबरच पुस्तकप्रेमी वाचक प्रतीत करणारे पुतळे करण्यात आले आहे.

म्हातारी माणसंही बगीच्यातच अधिक रमतात. त्या दृष्टीने पालिकेने नाना-नानी पार्कची व्यवस्था करण्यात आली आहे. या गार्डनमध्ये लहानपासून वयोवृद्धापर्यंत सर्वांच्या गरजा लक्षात घेण्यात आले आहे हे विशेष. कथा, कादंबरी, विविध चरित्र, कवितासंग्रह, विविध स्पर्धा परीक्षांचे पुस्तक येथे उपलब्ध असणार आहे. याबरोबरच पुस्तकाचे सेल्फी पॉईंटही तयार करण्यात आला आहे.

एरंडोल नगर परिषदेने साकारलेला पुस्तकांचा बगीचा हा राज्यातला पहीलाच प्रयोग आहे. हा नाविन्यपूर्ण बगीचा निश्चितच वाचन संस्कृती व संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. या बागेची रचना ही सगळ्याच घटकांचा विचार करून करण्यात आली आहे. हा बगीचा राज्यासाठी आदर्श ठरणार आहे हे निश्चित! एरंडोलवासीयांसाठी हे गार्डन पर्वणीच ठरणार आहे. या बगीच्याची सर्वत्र चर्चा सध्या कानी पडत आहे.

शहरातील नागरिकांमधे वाचन संस्कृती वृद्धिगंत व्हावी या उद्देशाने या पुस्तक बागेची निर्मिती करण्यात येत आहे. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्व जण पुस्तक वाचन करू शकतील अशी पुस्तक व व्यवस्था करण्यात आलेली आहे. लवकरच हा बगीचा नागरिकांसाठी खुला होणार आहे, असे एरंडोल नगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी सांगितले.

**-सुरेश पाटील,**
माहिती अधिकारी, जळगाव

---

# कार्तिक पौर्णिमा अर्थात त्रिपुरारी पौर्णिमा

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी शिव मंदिरात त्रिपुर वात (उंच खांबावर असलेल्या दिव्याची वात) लावली जाते. एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो.



त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला या वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. त्रिपुरासुराची तीन नगरे असून त्याला अभेद्य तट होता. त्यामुळे देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची अखेर प्रार्थना केली. तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा म्हटले जाऊ लागले. या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच नदीत दीपदान करून लोक आनंदोत्सव साजरा करतात. उत्तर भारतात या दिवशी स्कंद मूर्तीची पूजा करतात. दक्षिणेत या दिवशी कृत्तिका महोत्सव असतो. त्यात शिवपूजन केले जाते. या दिवशी भगवान विष्णू यांनी मत्स्यावतार घेतला अशीही धारणा आहे.

बौद्ध धर्मात असे मानले जाते की कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी तथागत बुद्धांचा एक पट्टशिष्य धम्म सेनापती सारिपुत्राचे परिनिर्वाण झाले होते. या पौर्णिमेला बौद्ध धर्मीय स्त्री-पुरुष आठ शीलांचे पालन व उपोसथ व्रत करतात. सर्व लहान थोर उपासक-उपासिका एकत्र जमून बुद्ध वंदना घेऊन धम्म उपदेश ग्रहण करतात. शीख धर्मातही या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. शीख धर्माचे संस्थापक गुरू नानकदेव यांची या दिवशी जयंती साजरी केली जाते.

त्रिपुरी पौर्णिमेचे औचित्य साधून मंदिर आणि सार्वजनिक ठिकाणी दीपोत्सव साजरा करण्यात येतो हे या दिवसाचे वैशिष्ट्य सांगता येते. मंदिरांमध्ये असलेल्या दगडी दीपमाळा या संध्याकाळी वाती लावून उजळल्या जातात. भाविक भगवान शंकरापुढे त्रिपुर वात लावून उत्सव साजरा करतात.

**(साभार : संत साहित्य)**

# विकासनिधी कमी पडू देणार नाही -वैकुंठ पाटील

## पेणमधील बोरी गावात विविध कामांचे भूमिपूजन





**पेण : प्रतिनिधी**

तुम्ही विकास कामे सांगा आम्ही विकासनिधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांनी शिंगणवट स्मशानभूमी व निवाराशेड बांधणे या कामाच्या भूमिपूजनावेळी बोलताना दिली.

बोरी ग्रामपंचायतमध्ये खऱ्या अर्थाने विकासाला सुरुवात झाली आहे. बोरी ग्रामपंचायत कमिटी भेटायला आली असता त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाची दुरवस्था झाल्याची बाब सांगितली. त्यानुसार जेएस डब्ल्यू स्टील सीएसआर विभागाचे हेड सुधीर तेलंग यांच्याशी बोरी ग्रामपंचायतसाठी सामाजिक सभागृहासाठी निधीबाबत चर्चा केली. त्यानुसार त्यांनी बोरी ग्रामपंचायत साठी सामाजिक सभागृह बांधण्यासाठी निधी मंजूर केल्याचे त्यांनी सांगितले.

जेएसडब्ल्यू फाऊंडेशन व सीएसआर विभाग तसेच मा. जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे यांच्या प्रयत्नातून बोरी ग्रामपंचायत हद्दीतील शिंगणवट येथील स्मशानभूमी व निवारा शेड बांधणे या कामाचे भूमिपूजन जेएसडब्लू सीएसआर हेड सुधीर तेलंग, मा.जि.प. सदस्या नीलिमा पाटील, मा. जि. प. विरोधी पक्ष नेते वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी बोरी सरपंच नंदिनी म्हात्रे, उपसरपंच स्वप्निल कोठावळे, सदस्य दिलीप म्हात्रे, सागर म्हात्रे, शैलेश म्हात्रे, विमल म्हात्रे, कल्पना म्हात्रे, ऐश्वर्या म्हात्रे, अपेक्षा म्हात्रे, माजी सरपंच विक्रम पाटील, के डी म्हात्रे, पत्रकार विजय मोकल, माजी उपसरपंच रविंद्र म्हात्रे, संजय पाटील, कृष्णा कोठावळे, रामनाथ म्हात्रे, शांताराम म्हात्रे, शंकर पाटील, बळीराम म्हात्रे, विश्वनाथ म्हात्रे, गोपीनाथ म्हात्रे, मधुकर म्हात्रे, वैभव म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, दामाजी पाटील,बाळकृष्ण म्हात्रे, विनायक पाटील, दत्ता दिवेकर, नरेंद्र म्हात्रे, अजित गावंड, गणेश म्हात्रे, सचिन कोठावळे, देवनाथ म्हात्रे, नारायण म्हात्रे, महादेव म्हात्रे, नारायण गावंड, ग्रामसेवक एकनाथ गाताडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

बोरी विभागातील कमिटी गेल्या अनेक महिन्यापासून आमच्या संपर्कात होती परिसराचा विकास या भावनेतून त्यांचे सकारात्मक प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्याकडे काम करण्याची क्षमता आहे. त्यामुळे या परिसराच्या विकासासाठी आम्ही त्यांच्या सोबत आहोत. लवकरच बोरी ग्रामपंचायतमध्ये सामाजिक सभागृहासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन सुधीर तेलाँग यांनी मनोगत व्यक्त करताना दिले.

या वेळी निलीमाताई पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, निवडून आल्यानंतर सदस्यांनी दहा ते पंधरा दिवसात विकास कामांना सुरुवात केली आहे ही कौतुकाची गोष्ट आहे. गावाच्या विकासासाठी लोकांनी ज्या विश्वासाने निवडून दिले आहे. तो विश्वास सार्थ ठरवा असे त्या म्हणाल्या.

# पेण पालिकेचा स्वच्छता अभियानात पुढाकार



**पेण : प्रतिनिधी**

शहर स्वच्छ व सुंदर असेल तर येणाऱ्या बाहेरच्या व्यक्तीला तसेच शहरातील नगरवासीयांना प्रसन्नता वाटते. पेण शहरामध्ये फक्त सुशोभीकरणच नव्हे तर सातत्याने स्वच्छताही आवश्यक आहे या तत्वानुसार पेण पालिका प्रशासनाने शहरांच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. दर महिन्यात जमा झालेला कचरा काढणे हे आरोग्यदायी वातावरणाच्दृया दृष्टीने समाधानाची बाब आहे

या धोरणानुसार पेण नगरपालिकेच्या वतीने शुक्रवारी २४ नोव्हेंबर सकाळी मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामधे पालिका प्रशासनाचे सर्व अधिकारी कर्मचारी व ७० सफाई कामगार असे एकुण शंभरहून अधिक जण सहभागी होऊन शहरातील मुख्य रस्त्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आणि आवश्यक त्याठिकाणी स्टील टिन बसवून कचरा टाकण्यासाठी उपाय योजना करण्यात आली. स्वच्छ शहर सुंदर शहर आरोग्यदायी शहर ही संकल्पना कायम ठेवली आहे.

दर महिन्यात किमान एकदा स्वच्छता अभियान घेण्यात यावेत, असे निर्देश रायगड जिल्हधिकाऱ्यांनी दिले असून त्यानूसार स्वच्छता अभियान राबविण्यात येते मात्र या पुढें जाऊनही स्वच्छता मोहीम राबविण्यात पेण नगर परिषद प्रशासनाचा पुढाकार असतो आज शुक्रवारी शहरातील मुख्य रस्त्यावर स्वच्छता अभियान घेवून रस्त्याचे सौंदर्यीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानूसार पेण नगरपरिषदेचे मुख्य प्रवेशव्दारापासून धरमतर रोड येथे स्वच्छता अभियानास सुरूवात करण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अभियानांतर्गत रस्त्यालगत असलेली गटारे स्वच्छ करण्यात आली. तसेच दुभाजक लगत साठलेली माती काढून दुभाजक स्वच्छ करण्यात आले. आवश्यक त्या ठिकाणी नवीन स्टील टिन बसविण्यात आले. अतिरीक्त वाढलेल्या झाडांची छाटणी करण्यात आली. विद्युत पोल सुस्थितीत करण्यात आले. रस्ता रूंदीकरणामध्ये व्यवसायीकांनी केलेले अतिक्रमण काढण्यात आले. रस्त्याच्या दुतर्फा औषध फवारणी करण्यात आली. रस्त्यालगत ८०० मीटर लांबीची सफाई करण्यात आली. रस्त्यालगतची गटारांची माती उचलण्यात आली तसेच जेसीबीच्या मदतीने सपाटीकरण करण्यात आले आणि दोन टन कचरा संकलीत करुन तो डम्पिंग ग्राऊंडवर तत्काळ नेण्यात आला

या अभियानात मुख्याधिकारी जिवन पाटील, कार्यालय अधिक्षक किरण शहा, नगर अभियंता सुहास कांबळे, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, स्वच्छता अभियान प्रमुख अभियंता अंकिता इसाळ, संगणक अभियंता निकीता पाटील, विद्युत अभियंता रेश्मा करंबेळे, आबासाहेब मनाळ, प्रशांत ढवळे, उमंग कदम, भरत निंबरे, किशोर जाधव, गौतम मोरे मंथन शिंदे व इतर कर्मचारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

अभियान पेण नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी व नागरीक असे एकूण १३० जणांच्या मदतीने यशस्वी करण्यात आले. या वेळी ५ ते ६ टन कचरा गोळा करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आंबेगाव येथे वाहतूक करण्यात आला.

# मुरूडमध्ये प्रसुती कक्षाचे उद्‌घाटन

**मुरूड : प्रतिनिधी**



ग्रामीण भागातील जनता हि सर्वस्वी रुग्णालयावर निर्भर असते.रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक सामान्य रुग्णांची सेवा म्हणजे ईश्वराची सेवा आहे असे समजून रुग्णालयातील डॉक्टरर्स व कर्मचाऱ्यांनी काम केले पाहिजे लोकांना आपुलकी व प्रेमाची वागणूक दिली गेली पाहिजे, असे प्रतिपादन शिवसेना युवा नेते अभिराज महेंद्र दळवी यांनी मुरूड शहरातील ग्रामीण रुग्णालयातील प्रसुती कक्षाचा लोकापर्ण सोहळ्याच्या कार्यक्रमावेळी बोलत होते.

ग्रामीण रुग्णालयामधील प्रसुती सेवांचास्तर उंचावण्यासाठी शासनाने ग्रामीण रुग्णालयातील विस्तारीत प्रसुती ग्रहांच्या रुपाने ग्रामीण भागातील महिलांना शासनाकडून आरोग्यदायी भेट उपलब्ध करून देण्यात आली आहे. यांचा फायदा शहरांसह ग्रामीण भागातील प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांना सुविधा मिळणार असल्याचे मत आमदार महेंद्र दळवी यांचे सुपुत्र अभिराज दळवी यांनी केले.

या वेळी शिवसेना युवा नेता अभिराज दळवी, जिल्हा शल्यचिकित्सक अलिबाग डॉ. अंबादास देवदाने, रुग्ण कल्याण नियमंक सदस्य समिती सदस्य मुरुड ग्रामीण रुग्णालय श्रीकांत सुर्वे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवल, डॉ. मकबुल कोकाटे,मुरुड शिवसेना तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, विजय सूर्वे, नर्स- निर्मला भोसले, प्रज्ञा पवार, महेश पाटील, दिपेश गुरव, आदिंसह ग्रामीण रुग्णालयातील सर्व अधिकार व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवसेना युवा नेता अभिराज दळवी यांच्या शुभ हस्ते दीपप्रज्वलन व गणेशाची पुजन करण्यात आले तद्नंतर प्रसुती कक्षाची फित कापून शानदार उद्‌घाटन करण्यात आले.

मुरुड ग्रामीण रुग्णालयात प्रसूती कक्षाची सुविधा झाल्याने ग्रामीण व शहरी भागातील जनतेला दिलासा मिळाला आहे. या वेळी सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन नर्स -प्रज्ञा पवार यांनी केले.

**रुग्णालयात डॉक्टराची कमतरता असुन याठिकाणी लवकरच स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञ डॉक्टरांची टीम मुरूड करांच्या सेवेत लवकरात लवकर रुजू करण्याचे प्रयत्न आमदार महेंद्र दळवी करतील तसेच वैद्यकीय अधिकारी यांना निवासस्थानाचा प्रश्न लवकरात लवकरच निकाली काढुन निवासस्थान उपलब्ध करून देण्याचे काम ही आमदार महेंद्र दळवी करणार आहेत.**

**-अभिराज दळवी,**
**युवा नेते, शिवसेना**

# पोलादपूर सवाद येथे त्रिपुरारी पौर्णिमा उत्सव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पहिली जत्रा सवाद येथील शंकरमहाबळेश्वर मंदिरामध्ये त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात येत असून रविवारी (दि. २६) सायंकाळी या त्रिपुरा प्रज्वलनासोबतच या यात्रौत्सवाला सुरूवात होणार आहे.

सवाद येथील शंकर महाबळेश्वर मंदिराचे ऐतिहासिक व पौराणिक माहात्म मोठे असून याबाबत अनेक आख्यायिका बुजूर्ग ग्रामस्थांकडून सांगितल्या जात आहेत.

# म्हसळ्यात गोवंश वाहतूक करणारे गजाआड

## १२ बैल आणि टेम्पोसह दोघांच्या आवळल्या मुसक्या

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा साई चेक पोस्ट येथे गोवंश वाहतूक करणाऱ्या दोघांना म्हसळा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून १२ बैल आणि टेम्पो जप्त करण्यात आले आहेत.

म्हसळा पोलीस ठाण्याचे नाईक सुरेश दिनकर पाळोदे यानी दिलेल्या फिर्यादीवरून म्हसळा पोलिसांनी गुन्हा र.नं .१३३/२०२३ भा.द.वि.कलम ३७९.३५३ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनीयम१९७६ चे कलम ५(अ),९, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम१ (घ), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ११९ प्रमाणे मोबीन अ हसन शेख (वय ३०, रा. कुर्ला), मिराज अहमद कुरेशी या दोन आरोपींना अटक केली. यामध्ये ५ ते ७ वर्ष वयाचे काळा, सफेद, तांबड्या रंगाचे १२ खोंड गोवंश जातीचे बैल आणि १२ लाख ५० हजार किंमतीचा टाटा कंपनीचा टेंपो नं एमएच ०३ डीव्ही ५५१४ असा मुद्देमाल म्हसळा पोलिसांनी ताब्यात घेतला.

दोनही आरोपीनी संगनमत करून गोवंश जातीच्या प्राण्यांची कत्तल करण्याचे उद्देशाने बेकायदेशीर वाहतुक करीत होते म्हसळा साई चेक पोस्ट येथे हवालदारांनी गोरेगावच्या दिशेने भरधाव येणाऱ्या टेपो गाडीला आडविण्याचा प्रयत्न करताच कर्तव्यावरील पोलीस कर्मचाऱ्यांना दोनही आरोपीनी धक्का बुक्की, आणि दमदाटी दिली. म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक संदीपान सोनावणे यांना गुन्ह्याचे गांभीर्य कळताच त्यांनी उ. वि. पो. अ. प्रशांत स्वामी यांना हकीगत कळविली. म्हसळा पोलीस स्टेशनचे हेड कॉस्टेंबल संतोष चव्हाण, शिर्के, देवरे, घोंगाणे, सुर्यकांत जाधव, मपोशि वर्षा पाटील, हंबीर श्रीवर्धन पीआय रिकामे, दिघी सागरी पीआय राजेद्र ढेबे घटनास्थळी पोहचले.

घटनेतील दोनही आरोपीना दोन दिवसांची पोलीस कस्टडी मिळाल्याचे तपासी अधिकारी सपोनी संदीपान सोनावणे यांनी सांगितले.

दक्षिण रायगडमधील बहुतांश तालुक्यांतील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गोवंश वर्गातील प्राण्यांची चोरी, अनधिकृत वाहतुक, हत्या या बाबत टोळ्या सक्रीय असून पोलीस प्रशासन सुद्धा सर्तक झाले आहे. एमएच ०३ डीव्ही ५५१४ हा टेम्पो आणि गोवंश महाड रायगड परिसरांतून आला अनेक भागांतून नागरिकानी त्याला अडविण्याचा प्रयत्न केला, लोणेरे (गोरेगाव) येथे नागरिकांनी अडविण्याचा प्रयत्न केला असता टेम्पो चालकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने म्हसळ्याकडे सुकाणू फिरविले कर्तव्य दक्ष आणि चतुर म्हसळा पोलिसांनी अखेर टेम्पो आणि दोनही आरोपींना ताब्यात घेतले.

# स्थलांतरित पक्ष्यांची घरट्यासाठी लगबग

**पाली : रामप्रहर वृत्त**



थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध प्रजातीचे देशी-विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होतात. अवकाळी पावसामुळे या पक्ष्यांची वाताहत झाली होती, मात्र आता जिल्ह्यातील वातावरण अनुकूल असल्याने स्थलांतरित पाहुण्यांची किलबिल वाढली आहे. ग्रामीण भागात थंडी पडू लागल्याने हे पक्षी स्थिरावले असले असून पाणथळ जागा, खाडीकिनारी, खारफुटीत घरटी बनवण्याची लगबग सुरू आहे. त्यांची रेलचेल वाढल्याने पक्षी अभ्यासक, पर्यटक सुखावले आहेत.

अवकाळी पाऊस, ऑक्टोबर हिट, त्यानंतर बदलेल्या हवामानामुळे स्थलांतरित पक्ष्यांसाठी पोषक वातावरण नव्हते, आता गुलाबी थंडीचा जोर वाढल्याने हिरवळीने नटलेले निसर्गसौंदर्य, अभयारण्य, पाणथळी भागात पक्षी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. वाढलेल्या गवतामधील कीटक व अळ्या, साठलेल्या जलाशयातील कृमी, मृदुकाय जीव-जंतू तसेच समुद्र किनारे, दलदलीचे भागातील छोटे खेकडे, मासे हे खाद्य त्यांना मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यात हे पक्षी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. समुद्रकिनारे, जंगलपट्टा, भातशेती, माळरानात विविध प्रजातीच्या रंगीबेरंगी पक्ष्यांचे दर्शन होऊ लागल्याने अभ्यासकांसाठी मोठी पर्वणी आहे.



**रायगड जिल्ह्यात ४०० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद झाली आहे. स्थलांतरित पक्ष्यांसाठी येथे पोषक नैसर्गिक अधिवास आहे. त्यामुळे दोन-तीन वर्षांपासून हिवाळ्यात येणाऱ्या पक्ष्यांची संख्या वाढली आहे. पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी ही गुलाबी थंडी पर्वणीच असते.**

**-शंतनू कुवेसकर,**
**वन्यजीव अभ्यासक**



### परदेशी पक्ष्यांचा बोलबाला

*शंकर (ब्ल्यू थ्रोट), तास पक्षी (युरोपियन रोलर), मानमोडी (युरेशियन रायनेक ), गप्पीदास पक्षी (सायबेरियन स्टोनचाट ), भारीट (बंटिंग्स), पांढूरका भोवत्या (पॅलिड हॅरिअर)*

### स्थानिक पक्षी

*स्वर्गीय नर्तक (पॅराडाईज फ्लाय कॅचेर), भारतीय तास पक्षी (इंडियन रोलर), खाटीक (श्राईक), हुदहुद (युरेशियन हुपू), युवराज (क्रेस्टेड बंटीग)*

### जगण्यासाठी प्रवास

*उत्तर गोलार्धातील युरोप, रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशांत थंडीच्या दिवसांत पडणाऱ्या बर्फामुळे पक्ष्यांना खाद्य मिळणे कठीण होते. त्यामुळे हे पक्षी स्थलांतर करून उपजीविका भागवतात. आपल्याकडे पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य तसेच योग्य अधिवास यामुळे पक्ष्यांना घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून बऱ्याच स्थलांतरित पक्ष्यांचा विणीचा हंगामसुद्धा हाच असतो, असे विळे-भागाड येथील पक्षी अभ्यासक राम मुंडे यांनी सांगितले.*

# श्री वरदायिनी विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा आज स्नेहमेळावा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयाचे १९७० पासूनचे विद्यार्थी विद्यार्थिनी रविवारी (दि. २६) पुन्हा शाळेमध्ये एकत्र येणार असून यासाठी श्री वरदायिनी माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा हे कारण ठरणार आहे.

श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयात १९७० पासून एसएससी आणि २००५ पासून कला विज्ञान आणि वाणिज्य शाखांची एचएससी अशा बॅचेस सुरू झाल्या आहेत. या विद्यालयाचे माजी विद्यार्थी राजकारण, उद्योजकता, व्यापार, विविध क्षेत्रातील नोकरी, महसूल विभागातील नोकरी, डॉक्टर, इंजिनियर, वकील, विविध प्रकारचे व्यवसाय आणि सामाजिक कार्य अशा प्रकारे नावलौकिक प्राप्त झालेले आहेत. या विद्यार्थ्यांच्या मदतीमधून श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयामध्ये प्रयोगशाळा, वर्गखोल्या, सभागृह तसेच विविध प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

रायगड शिक्षण प्रसारक मंडळ महाड संचालित या श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयात माजी सभापती सिताराम दौलती सकपाळ यांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या शैक्षणिक प्रगतीची कामे झाली असून या रायगड जिल्ह्यातील संस्थेमध्ये महाड व पोलादपूर तालुक्यातील विद्यार्थी विविध शाखांचे शिक्षण घेऊन आयुष्यात यशस्वी झाले आहेत. याच विद्यार्थ्यांच्या मदतीतून कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयात अनेक विद्यार्थी आणि शिक्षणोपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत, अशी माहिती प्राचार्य गुलाब येरूणकर यांनी दिली.

सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी देणगीस्वरूपात दिलेल्या रकमांचा वस्तुरूप विनियोग केल्याचे दर्शविण्यात आले असल्याची माहिती देत विजय सकपाळ आणि गणेश सुतार यांच्या माध्यमातून या विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध होणार असून त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मुख्याध्यापक गुलाब येरूणकर यांनी विश्वास ठेऊन संस्थेच्या व माजी विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या अपरोक्ष शाळेच्या विकासाआधीच जमा करून आपली अमर्याद अधिकारकक्षा स्पष्ट केली आहे.

दुपारी १ वाजल्यापासून कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी माध्यमिक विद्यालयातील श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी याप्रसंगी मोठया संख्येने उपस्थित राहतील, असा विश्वास प्राचार्य गुलाब येरूणकर यांनी व्यक्त केला.

# पावणे, कोपरीत पाणीटंचाई कायम

## रहिवासी त्रस्त; वेगळे नियोजन करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या वर्षभरापासून नवी मुंबई महापालिका हद्दीत अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई जाणवत आहे. यात गावठाणभागात पाण्याची समस्या गंभीर होत चालली आहे. पावणे गाव आणि कोपरी गाव या दोन्ही गावात सध्या पाण्याची समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळे गावठाण भागासाठी पाण्याचे वेगळे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

प्रत्येक ठिकाणच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन त्यानुसार महापालिकेने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. पुरवठा सुरळीत नाही झाला, तर महापालिकेवर हंडा मोर्चा नेण्याचा इशारा पावणे ग्रामस्थांनी महापालिकेला दिला आहे.

पावणे गाव हे एमआयडीसीच्या हद्दीत असणारे गाव आहे, मात्र या गावात गेल्या वर्ष भरापासून कमी दाबाने, पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाण्याच्या समस्येने नागरिक त्रस्त झाले आहेत. पाण्याचा दाब वाढावा यासाठी अनेकांनी मोटार लावून पाणी मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, मात्र मोटार लावण्याचा खर्च करूनही पाण्याचा दाब वाढलेला नाही. पाण्याची टंचाई कायम आहे. यासाठी अनेक वेळा



ग्रामस्थांनी महापालिकेकडे पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी मागणी केली आहे, मात्र त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. पावणे गाव हे एमआयडीसी हद्दीत येत असल्याने, या भागात एमआयडीसीकडून पाणी पुरवठा केला जातो. एमआयडीसी कडून होणारा पाणीपुरवठा हा पूर्वी होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या तुलनेत आधीच कमी झालेला आहे. त्यात लोकसंख्या वाढली आहेत. घरे वाढली तशी पाण्याची मागणी ही वाढली आहे. त्यामुळे पाण्याची टंचाई अधिक जाणवत आहे.

शिवाय प्रत्येक शुक्रवारी एमआयडीसीकडून पाण्याचे शट डाऊन घेतले जाते त्यामुळे दिवसभर पाणी नसते, मात्र दुसऱ्या दिवशी पाणी यायला अर्धा दिवस वाट पाहावी लागते, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. अनेकदा पाण्यासाठी सर्वांना रात्री अपरात्री जागावे लागते. त्यामुळे लवकरात लवकर पाण्याची समस्या निकाली नाही निघाली तर पाण्यासाठी महापालिकेवर हंडा घेऊन आम्ही धडकणार, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

कोपरी गावात कमी दाबाने अपुरा पण पुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी रात्री जागावे लागते, एकूणच गावात मागणीनुसार पाणी पुरवठा न होता एकूण मागणीच्या केवळ तीस टक्केच पाणी पुरवठा होत आहे. कोपरी गावात रात्री ३ वाजता पाणी येत असते. त्यामुळे पाणी भरण्यासाठी ३ वाजता उठावे लागते. ते ही कमी येते. त्यामुळे पाण्यासाठी भांडणे होण्याची वेळ येत आहे.

### हंडा मोर्चा काढण्याचा इशारा

पावणे गावातील जलकुंभातून दिवसातून दोन वेळा पाणी पुरवठा केला जातो, मात्र निम्म्या रहिवाश्यांना पाणी मिळते तर निम्म्या रहिवाश्यांना पाणी मिळत नाही, खाराटकर आळीमध्ये तर अनियमित पाणी पुरवठा कायम आहे. त्यामुळे हाताची कामे सोडून पाण्याच्या मागे. लागावे लागते. चार मजली इमारतीमध्ये तर पहिल्या दुसऱ्या माळ्यावरील घरात पाणी पोहचते मात्र तीन आणि चार मजल्यावर पाणी जात नाही. त्यामुळे आता आम्ही महापालिका कोपर खैराणे विभाग कार्यालयावर हंडा मोर्चा काढणार आहोत, असे पावणे गावचे रहिवाशी विलास खराटकर यांनी सांगितले.

### 'लवकरच योग्य नियोजन करू'

जास्त दाबाने गरजे इतके पाणी दिल्यास नागरिकांना योग्य पाणी पुरवठा होईल आणि गावातील पाण्याची समस्या निकाली निघेल, असा विश्वास माजी नगरसेविका उषा भोईर यांनी व्यक्त केला आहे. आणि त्यानुसार महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना पत्र देऊन पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी त्यांनी केली आहे. आयुक्तांनीही यावर योग्य नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल, असे सांगितले.

# चिरनेर परिसरात उभारले वनराई बंधारे

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

गाव पातळीवर पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवणे काळाची गरज असून, शेतकरी आणि पशुपक्ष्यांसाठी वनराई बंधारे वरदान ठरत आहेत. चिरनेर येथील श्री महागणपती सेंद्रिय गटामार्फत आणि उरण तालुका कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ–नारनवर, मंडळ कृषी अधिकारी किसन शिगवण, श्री महागणपती सेंद्रिय शेती गटाचे अध्यक्ष तथा कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे, कृषीसहाय्यक अधिकारी सुरज घरत या सर्वांच्या नेतृत्वाखाली दरवर्षीप्रमाणे यावर्षीही चिरनेर गावातील शेतावरील ओढ्या नाल्यांच्या परिसरात दोनवनराई बंधारे बांधण्यात येथील शेतकरी यशस्वी झाले आहेत.

दरवर्षी पावसाचे पाणी खूप पडते. हे पाणी धरण असो अथवा छोटे ओहोळ किंवा ओढे यामध्ये साचत असते. मात्र पाऊस गेला की ओढे नाले काही दिवसातच सुखे ठाक पडत असतात. त्यामुळे पाण्याची पातळी वाढवून, काही दिवस पाणी येथेच अडविले, तर काही महिने या पाण्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागत असतात. यातून ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला भाजीपाल्याचे उत्पादन घेता येते. त्याचबरोबर गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य प्रश्नही मार्गी लागत असतो.

पावसाळा संपला की पाण्याचे विविध स्तोत्र तळ गाठत असतात, मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण आडवू शकतो आणि हेच पाणी



आपल्यासाठी मोठे वरदान ठरत असते. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्व समजते. कारण विहीरी, तलाव, कुपनलिका, ओढे असे पाण्याचे असलेले स्तोत्र, तळ गाठण्याची स्थिती निर्माण करीत असतात. पाणी हे आपले जीवन आहे. कारण जल है तो हम है. अशा पद्धतीचे उच्चार सातत्याने आपण करीत असतो, मात्र ते आचरणात कोणीही आणत नाही.

> तुरळक ठिकाणी बंधारे बांधून पाणी अडविले जाते, मात्र प्रत्येकाने आपले नैतिक कर्तव्य म्हणून पाणी अडविले पाहिजे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशुपक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो.
>
> **–अर्चना सुळ–नारनवर,** उरण तालुका कृषी अधिकारी


> पाण्याचे महत्त्व जाणून घेऊन बंधारा बांधून पाणी अडविले पाहिजे. या पाण्याचा वापर गुरांची तहान भागवण्यासाठी तसेच जंगलातील प्राण्यांना पाणी पिण्यासाठी होत असतो. शिवाय शेतकरीवर्ग यावरती भाजीपाल्याचे उत्पन्न घेतात. यामुळे त्यांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होते. त्यासाठी ग्रामपंचायत तसेच कृषी विभागाने या संदर्भात लक्ष घालून ही संकल्पना राबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
>
> **–प्रफुल्ल खारपाटील,** अध्यक्ष, श्री महागणपती सेंद्रिय शेती गट चिरनेर

> तालुक्यातील असलेले बहुतेक ओढे आता तळ गाठण्याच्या स्थितीत असून लवकरच उपयोजना करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यासाठी सिमेंटच्या गोण्यांमध्ये माती भरून प्रवाह असलेल्या ठिकाणी एकावर एक रचून ठेवल्यास काही ठिकाणी काही महिने पाणी जमा होऊन भूजल पातळी वाढण्यास मदत होईल.
>
> **–सुरज घरत,** कृषी सहाय्यक अधिकारी

# नाट्यसंगीत अभ्यासक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी रंगभूमीला १८० तर मराठी संगीत रंगमूमीला नुकतीच १४३ वर्षे पूर्ण झाली आहेत. अशा या अभिजात मराठी नाट्यसंगीताची आजच्या तरुण पिढीला ओळख व्हावी यासाठी पनवेल कल्चरल असोसिएशनने तीन महिन्यांचा नाट्यसंगीत अभ्यासक्रम तयार केला असून तो येत्या जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०२४मध्ये दर शनिवार–रविवारी संस्थेच्या सभागृहात आयोजित केला जाईल.



या अभ्यासक्रमात लोकप्रिय अशी दहा नाट्यगीते तज्ज्ञ व जाणकार मार्गदर्शकांकडून विद्यार्थ्यांना शिकविली जातील. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा घेतली जाईल. तसेच सर्व विद्यार्थ्यांचा एक स्वतंत्र स्टेज कार्यक्रमही आयोजित केला जाईल. २० डिसेंबरपर्यंत प्राप्त होणाऱ्या पहिल्या केवळ वीस जणांनाच या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जाईल. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी नंदकुमार कर्वे (९८६९४३०२६९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भीषण अपघातात तीन जण ठार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत गुरुवारी मध्यरात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातात तीन जण ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. नेरूळ भागात हा अपघात झाला. एका कारची ट्रॉलीला धडक झाल्यामुळे हा भीषण अपघात झाला असून घटनास्थळाचा व्हिडीओ पीटीआय वृत्तसंस्थेकडून एक्सवर (ट्विटर) पोस्ट करण्यात आला आहे.

पीटीआयनं पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये एक कार रस्ता दुभाजक ओलांडून थेट पलीकडच्या बाजूच्या मोठ्या ट्रॉलीखाली घुसल्याचं दिसत आहे. या अपघातात कारचा अक्षरश: चुराडा झाला आहे. त्यामुळे प्रचंड वेगात ही कार ट्रॉलीला धडकली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या व्हिडीओमध्ये कारचा क्रमांक एमएच ४३ बीई ५८७२ असल्याचं दिसत आहे. पांढऱ्या रंगाच्या या कारचा पुढचा भाग पूर्णपणे ट्रॉलीच्या खाली गेला आहे.

# नवी मुंबईत डिसेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय योग स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

योग प्रशिक्षणात अग्रेसर असलेल्या आर्ट ऑफ लर्निंग फाऊंडेशनच्या वतीने येत्या २३ आणि २४ डिसेंबर रोजी नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत स्थानिक स्पर्धकांसह देश–विदेशातील स्पर्धक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना नोंदणी करणे आवश्यक राहणार आहे.

सुदृढ आरोग्यासाठी योगाचा प्रसार करण्यासाठी आर्ट ऑफ लर्निंग फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदाची आंतरराष्ट्रीय योग स्पर्धा नवराष्ट्र–२०२३ या नावाने ओळखली जाणार आहे. स्पर्धेमध्ये स्थानिक स्पर्धकांबरोबर देशभरातील आणि दुबई, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्ससह अन्य देशातील स्पर्धक मोठ्या संख्येने सहभागी



होणार आहेत. गेल्या वर्षी या स्पर्धेमध्ये स्पर्धकांना ऑनलाईन सहभाग घेता आला होता, मात्र यंदा नवी मुंबईत येऊनच स्पर्धेत सहभागी होता येणार आहे, असे फाऊंडेशनच्या अध्यक्षा योगगुरू डॉ. रिना अग्रवाल यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी नवी मुंबई चॅम्पियन्स सर्व्हिस फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रताप मुदलियार यांनी विशेष सहकार्य केले आहे. स्पर्धकांनी नाव नोंदणीसाठी ८०८०२१२८५१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खारघरमध्ये युवा संसद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

देशातील महत्त्वांच्या विषयांवर आणि युवकांच्या सामाजिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी खारघर येथे युवा संसद होणार आहे. या संसदमध्ये राज्यातील प्रत्येक जिल्हातील सक्रिय युवक सहभागी होत असून युवकांच्या विविध प्रश्नावर आहेत. खारघरमधील युवा सेंटरमध्ये २५ ते २७ नोहेंबर दरम्यान अनुभव शिक्षा केंद्र महाराष्ट्र संस्थेतर्फे हा कार्यक्रम होणार आहे.

महाराष्ट्र पातळीवर एक युवकांचे संघटन तयार करून युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठीचा कृती कार्यक्रम या युवा संसदेच्या माध्यमातून ठरणार आहे. अनुभव शिक्षा केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात युवकांना संविधानिक मूल्य रूजवण्याची तसेच नेतृत्व घडवण्यासाठीची प्रक्रिया राबवली जात आहे.

# बीसीटी विधी महाविद्यालयात पॉश प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉमध्ये शुक्रवारी (दि. २४) पॉश (लैंगिक छळ प्रतिबंध) प्रशिक्षण आयोजित केले गेले.

महिला विकास कक्षाने अंतर्गत तक्रार समितीच्या सहकार्याने आयोजित केले लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत, इव्हेंटचा उद्देश महत्त्वाकांक्षी वकिलांना राष्ट्रीय कायदे, कामाच्या ठिकाणी धोरणे आणि लैंगिक छळ टाळण्यासाठी सक्रिय उपाययोजनांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी देऊन सुसज्ज करणे हा आहे.

प्रेरणा गायकवाड, बीएलएस एलएलबी चौथ्या वर्षाचा विद्यार्थी, यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सहाय्यक प्राध्यापिका भाग्यश्री कांबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित




करण्यात आला. सहाय्यक प्राध्यापिका श्रीमती कदम यांनी एक अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले, ज्यात कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, व्याख्या आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे या विषयांवर चर्चा केली.

पॉश प्रशिक्षण हा एक सुव्यवस्थित आणि माहितीपूर्ण उपक्रम असल्याचे सिद्ध झाले, ज्याने उपस्थितांना गुंतवून ठेवण्यासाठी शैक्षणिक सामग्रीसह सांस्कृतिक घटकांचे यशस्वीपणे मिश्रण केले. मिळालेल्या ज्ञानामुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना सक्षम बनवणे अपेक्षित आहे, ज्यामुळे ते लैंगिक छळाच्या घटना ओळखण्यास आणि त्यांचे निराकरण करण्यास सक्षम होतील.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गीताच्या उत्साही सादरीकरणाने झाली आणि देशभक्तीची भावना जागृत झाली.

# स्फूर्तीगीत स्पर्धेत सुनील म्हात्रे प्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचा ५व्या वर्धापन दिनाच्या औचित्याने लोकनेते दि.बा.पाटील स्फूर्तीस्थान या चळवळ स्पर्धा आयोजीत करण्यात आलेली आहे. स्पर्धेत १२ हजारांहुन अधिक संख्येने सर्वसामान्य नागरिकांनी सहभाग नोंदवला आहे. या दि. बा. पाटील स्फूर्तीस्थान चळवळ स्पर्धे तील स्फूर्तीगीत सादरीकरण प्रकारातील ऑडिओ कॅटेगरीतील प्रथम क्रमांकाचे विजेचे सुनिल म्हात्रे ठरले.

घणसोली गावात घणसोली गावचे माजी नगरसेवक घनश्याम मढवी व माजी नगरसेविका शोभा पाटील यांच्याहस्ते बक्षीसाची रोख रक्कम २०,१०१ इमानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी दि.बा पाटील चळवळ स्पर्धेचे प्रवक्ते व संस्थेचे सहसचिव शैलेश घाग, निर्मिती अनुष्का रेकॉर्डिंग स्टुडिओचे गीतकार भानुदास पाटील, गायक तुषार शिंदे, संगीतकार सुनिल श्रीपत म्हात्रे, संगीत संयोजक सुनिल म्हात्रे, रवी मढवी व निरज म्हात्रे हे उपस्थित होते.

दि. बा. पाटील चळवळ स्पर्धेला मिळत



असलेला वाढता उस्फुर्त प्रतिसाद लक्षात घेता यातील चित्रकला, लेख, स्फूर्तिगीत लेखन, ऑडिओ, व्हिडीओ, दि. बा. पाटील साहेबांचे दुर्मीळ फोटो (अल्बम), वृत्तपत्र कात्रणे (न्यूज पेपर कटींग), चित्रीकरण (व्हिडीओ शूटिंग) दि. बा. पाटील साहेबांचे हस्तलिखित पत्र, दि बां च्या आंदोलन व संघर्षांवर माहितीपट स्पर्धा, शॉर्ट फिल्म आदि साहित्य व कला स्वीकारण्याची अंतिम तारीख वाढवून ती २० डिसेंबर २०२३ पर्यंत करण्यात आली असल्याचे आयोजक दशरथ भगत यांनी सांगितले आहे. हा सन्मान सोहळा जानेवारी २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

# तळोजात नामवैभव भजन, कीर्तन महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा–खारघर येथील मनोहर कडू आणि वैभव कडू हे गेली २२ वर्षे आपले पिताजी भजनशिरोमणी नामदेवबुवा खुटारीकर यांच्या स्मृतिप्रत्यर्थ तळोजा परिसरात भजन–कीर्तन व शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित करतात.

यावर्षी हा महोत्सव १२ ते १७ डिसेंबर असा ६ दिवस चालणार असून यात चंद्रशेखर महाराज देगलूरकर, केशवमहाराज नामदास, योगिराज महाराज गोसावी, भरत महाराज पाटील, चैतन्य महाराज देगलूरकर आणि जयवंत महाराज बोधले अशा ६ नामवंत कीर्तनकारांची कीर्तने सायं. ६ वा. तसेच बाळासाहेब वाईकर, शंकरराव वैरागकर, यादवराज फड, विदुषी शाल्मली जोशी, पं. संजीव अभ्यंकर, महादेवबुवा शहाबाजकर, दत्तात्रय ओढांगीकर अशा अनेक नामवंत गायक–गायिकांच्या अभंगवाणीचा आनंद रात्री ८.३० नंतर भाविकांना घेता येणार आहे.

याशिवाय उदय कुलकर्णी आणि प्रतापराज पाटील यांची तबला–पखवाज जुगलबंदीही रंगणार आहे. हे सर्व कार्यक्रम भाविकांसाठी विनाशुल्क असून अधिक माहितीसाठी वैभव कडू (९३२४०९२४५१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाशांचा सर्व्हे व्हावा

**नवी मुंबई : बातमीदार**

घर हक्क संघर्ष समितीच्या सदस्यांनी शिवसेना उपनेते विजय नहाटा यांची भेट घेतली. नवी मुंबई झोपडपट्टीत रहाणाऱ्या रहीवाशांचा सर्वे व्हावा एमआयडीसीच्या जमीनीवरील झोपडपट्टीचा सर्वे करण्याचा निर्णय झाला आहे, त्यानुसार सिडको, वनखाते खासगी जमीन, शासकीय जमिनीवर रहाणाऱ्या रहीवाशांच्या बाबतीत निर्णय करण्यात यावा, अशी मागणी या वेळी उपनेते विजय नाहटा यांच्याकडे करण्यात आली.

बेलापुर टाटा नगर येथील हाय टेंशन वायर खालील झोपडपट्टी रहिवाशांना बेदखल करु नये या मागण्याचे निवेदन देण्यात आले. शिवसेना उपनेते विजय नहाटा यांनी मुख्यमंत्र्यांकडे हे निवेदन देऊन घर हक्क संघर्ष समीतीच्या शीष्टमंडळाबरोबर भेट करून चर्चा करू, असे ठोस आश्वासन रहिवाशांना दिले. या वेळी शिवसेना उपजिल्हा प्रमूख रोहीदास पाटील, नवी मुंबई महिला संघटक सरोज पाटील, नवी मुंबई प्रमुख प्रदीप वाघमारे आदी उपस्थित होते.

### घर हक्क संघर्ष समितीची मागणी



घर हक्क संघर्ष समितीच्या शीष्टमंडळात ॲड. सुजीत निकाळजे, हिरामण पगार, सुनंदा बावीसकर, लक्ष्मण देठे, फरजाना, दीपक व अन्य रहिवाशी होते. नवी मुंबईतील इतर प्रश्न सोडवीण्या बाबत चर्चा झाली. हि भेट रोहीदास पाटील यांच्या निवासस्थानी पार पडली.

# खालापुरात विकसित भारत संकल्प यात्रा

## तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांनी दाखविला झेंडा

**चौक : प्रतिनिधी**

ज्या योजनांचा लाभ लक्षित लाभार्थी यांच्यापर्यंत पोहचला नाही अशा लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारच्या मदतीने विकसित भारत संकल्प यात्रा या नावाने देशव्यापी मोहीम सुरु केली आहे. खालापूर तालुक्यात शनिवारी (दि. २५) तहसीलदार आयुब तांबोळी व गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखून संकल्प यात्रेला सुरुवात करण्यात आली.



केंद्र सरकारने गरजू आणि गरजवंत लाभार्थी यांच्यापर्यंत ज्या योजनांचा लाभ मिळाला नाही अशा लाभार्थ्यांसाठी विकसित भारत संकल्प यात्रा ही मोहीम राज्य सरकारच्या मदतीने सुरु केली आहे. खालापुरात शासनाच्या सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत या रथयात्रेला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. माहितीचा प्रसार, योजनांबद्दल जागरूकता, नागरिक यांच्याशी संवाद साधून विविध मार्गाने योजनांची माहिती देणे, संभाव्य लाभार्थी यांची नोंदणी करणे, कृषी विभाग व शेतकरी यांचा संवाद साधला जाईल, ग्रामीण विकास आणि आदिवासी विकास विभाग यांची माहिती उपलब्ध होईल. हवामान, सण यांचा विचार करून यात बदल होईल. ग्राम स्वराज्य अभियान राबविण्यात पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील उन्नती साधली जाईल, असे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सांगितले.

या वेळी अप्पर तहसीलदार पूनम कदम, अगविका राजपूत, विस्तार अधिकारी महादेव शिंदे, पाणीपुरवठा अधिकारी चव्हाण यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. ही यात्रा खालापूर तालुक्यातील प्रत्येक गावातून जाणार असून त्या त्या ठिकाणी संकल्प यात्रेची माहिती दिली जाणार आहे तसेच खालापूर तालुक्याचा नियोजनबद्ध आराखडा देण्यात आला आहे.

# ओबीसी महासंघाचे राज्य अधिवेशन, पुरस्कार सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**



ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ राज्य अधिवेशन नुकतेच झाले. या अधिवेशनात रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्काराने महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या हस्ते व महासंघाचे राजाध्यक्ष शाम लेडे, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, सरचिटणीस अनिल नाचपल्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान करण्यात आला. या वेळी माणगाव तालुक्यातील नाणोरे गावची सुकन्या व द. ग. तटकरे महाविद्यालय माणगावच्या ग्रंथपाल, लोकनेते अशोकदादा साबळे प्रतिष्ठान माणगाव कार्यकर्त्या संगीता गंगाराम उतेकर यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका म्हणून राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या अधिवेशनात सामाजिक कार्यकर्ते निलेश सत्वे यांनाही डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास रायगड कर्मचारी संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष विनया जाधव, सौ. नाचपल्ले, राजेंद्र पाटील, श्री.भोईर, श्री.घरत, मुंबईकर मंडळ यांच्यासह ओबीसी लोक उपस्थित होते.



# खालापुरात आढळला दुर्मीळ चित्रांग नायकूळ साप

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातून जवळपास पंधरा वर्ष दिसेनासा झालेला चित्रांग नायकूळ साप खोपोली शहरात आढळून आला असून सर्पमित्रांनी सुरक्षितपणे या सापाचा बचाव केला आहे. खोपोलीतील वरिष्ठ सर्पमित्र नवीन मोरे यांना मुस्तफा पारकर यांनी फोन करून सापाबद्दल माहिती दिली. नवीन मोरे आणि सहकारी हर्ष सोनावणे तेथे गेले असता चित्रांग नायकूळ हा साप असल्याचे लक्षात आले. हा साप खोपोली, खालापूर भागात अत्यंत दुर्मीळ आहे.

चित्रांग नायकूळ हा साप पूर्णपणे बिनविषारी आहे. तो सहसा मानव वस्तीत आढळून येत नाही. यापूर्वी २००८-२००९मध्ये खोपोलीमध्ये सर्पमित्र नवीन मोरे यांनीच दोनदा या सापाचा सुरक्षित बचाव केला होता. त्यानंतर साधारण पंधरा वर्षांनी हा साप आढळून आला. त्यामुळे ही खोपोली, खालापुरातील सर्पमित्रांसाठी आनंदाची बाब असल्याचे सर्पमित्र मोरे यांनी सांगितले.



# कुणबी दाखल्यांसाठी सामुहिक प्रयत्नांची गरज -शंकर म्हस्कर

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगडातील रोहा, अलिबाग, मुरुड, कर्जत, खालापूर, पनवेल, पेण, पाली तालुक्यांतील अनेकांच्या दाखल्यांवर कुणबी मराठा नोंदी आहेत. आता कुणबी दाखल्यांसाठी प्रभावीपणे सामुहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी चांगली परिस्थिती निर्माण झाली आहे, अशी प्रतिक्रिया तत्कालीन कुणबी उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ अभ्यासक शंकर म्हसकर यांनी दिली आहे.राज्यातील मराठ्यांना सरसकट आरक्षण द्यावे, अशी मागणी होत आहे. यासाठी आंदोलने सुरू असून मराठा नेते मनोज जरांगे-पाटील लढा देत आहेत. राज्यात आतापर्यंत २९ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. रायगडातील मराठा आरक्षण मुद्दाही ढवळून निघालाय.

अनेक गावांतील कुटुंबांच्या दाखल्यांवर हिंदू मराठा, कुणबी मराठा नोंदी मोठ्या प्रमाणात असल्याने गरीब कुणबी कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. १८६५ मोडी लिपी कारभार, जन्म नोंदी, उर्दू लिपी, संरक्षीत कुळे यांसह १९६७ पूर्वीचे जन्म पुरावे देण्याचे मोठे आव्हान त्या त्या वेळी राहीले. त्यातून काहींनी अग्निदिव्य पार करत कुणबी पडताळणी दाखले मिळविले, मात्र आजही रोहा तालुक्याच्या निवी, तळाघर, लांढर, खांब, कोलाड, चणेरा, नागोठणे भागातील अनेक गरीब शालेय विद्यार्थी, कुटुंब प्रमुख यांच्या दाखल्यावर कुणबी मराठा नोंदी राहिल्याने आरक्षणाचा लाभ घेता आला नाही. तब्बल एका पिढीचे नुकसान व्यवस्थेने केले.

तत्कालीन कुणबी समाजाचे नेते वगळता आजच्या नेत्यांनी यासाठी ठोस प्रयत्न केले केले नाहीत याची नाराजी तरुणांमध्ये असताना आतातरी मराठा आरक्षण लढ्याचा लाभ आपल्या समाजाला देण्यासाठी नेतेगण प्रयत्न करतील का, अशी मागणी जोर धरत आहे.

### ७० टक्के समाज वंचित

*चुकीच्या नोंदी पडलेल्या, पण जन्माने व कर्माने कुणबी असणाऱ्या, कुणबी मराठा दाखले असलेल्या कुटुंबांना व विद्यार्थ्यांना या पडताळणीचा लाभ झाला पाहिजे. निवी, तळाघर, लांढर भागाचा विचार केल्यास जवळपास ७० टक्के तरुणांच्या, कुटुंब प्रमुखाच्या दाखल्यावर कुणबी मराठा नोंदी आहेत. त्या कुटुंबांना आरक्षणाचा लाभ उठवता आलेला नाही. हा मुद्दा वारंवार मांडला, पण कुणबी मराठा दाखल्याचा मुद्दा आजही सुटलेला नाही. हे लोक दाखल्याअभावी कुणबी प्रक्रियेत येत नाही, असे कुणबी समाज* तालुका उपाध्यक्ष शंकर भगत यांनी सांगितले.

# माथेरानमध्ये मासिक स्वच्छता मोहीम

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

फक्त सुशोभीकरण नव्हे; तर सातत्याने स्वछता असणे आवश्यक असून स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांना दिले आहेत. त्या अनुषंगाने माथेरानमध्येही मासिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला. या वेळी पॅनोरमा हॉटेल ते अहिल्याबाई होळकर चौकापर्यंतच्या रस्त्याची साफसफाई आणि गटारातील कचरा उचलण्यात आला. यात रस्तात पडलेली झाडे, गटारत पडलेल्या बाटल्या काढून स्वच्छता करण्यात आली. या वेळी एकूण एक टन कचरा सुमारे ५० कर्मचारीवर्गाच्या साहाय्याने उचलून शहर स्वच्छ करण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेत नगर परिषदेचे अधिकारी स्वछता निरीक्षक नरेंद्र सावंत, वरिष्ठ लिपिक प्रवीण सुर्वे, अन्सार महापुळे, ज्ञानेश्वर सदगीर यांच्यासह रामचंद्र चव्हाण, कैलास सोनावळे आणि सर्व सफाई कामगारवर्ग उपस्थित होता.



# तळवली-साजगाव वारकरी पायी दिंडी

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील बोंबल्या विठोबा यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेल्या साजगाव यात्रेस कार्तिकी एकादशीपासून प्रारंभ झाला आहे. तालुक्यासह जिल्ह्यातील वारकरी संप्रदायाच्या वतीने विठूरायाच्या चरणी लीन होण्यासाठी पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत खालापूर तालुक्यातील तळवली गावातील वारकऱ्यांनी पायी दिंडी काढली.

पायी दिंडी माजगाव, अंबिवली येथे येताच नवनिर्वाचित सदस्य राजेश पाटील, स्मित संकल्प व्यवस्थापक मंगेश पाटील, काळूराम जाधव, नितीन काठावले यांच्या हस्ते या दिंडीचे स्वागत समारंभ करून अल्पोहार देण्यात आले. या वेळी आंबिवली ग्रामस्थ बहुसंख्येने वारकऱ्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होते. मुखी हरीचे नाम आणि टाळ-मृदुंगाच्या गजरामध्ये ही दिंडी मजल-दरमजल करीत साजगावाच्या विठूरायाचरणी लीन झाले. या दिंडीत आयोजन मधुकर मालकर, जगन्नाथ मालकर, तानाजी मालकर, भरत मालकर, देविदास मालकर महेंद्र मालकर, रामदास मालकर, सदस्य संदेश मालकर, वैभव लबडे, रूपेश मालकर, सागर मालकर तसेच अन्य वारकरी सहभागी झाले होते.

# वावोशी, डोणवत येथील व्यापाऱ्यांची वावोशी पोलीस चौकीत बैठक

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक बाळासाहेब कुंभार यांच्या मार्गदर्शनवजा सुचनेनुसार वावोशी, डोणवत येथील व्यापाऱ्यांसोबत वावोशी दुरक्षेत्र पोलीस चौकीतील अधिकारी आरोटे यांनी बैठक घेतली. यात्रा काळात तसेच थंडीच्या महिन्यात होणाऱ्या घरफोडीच्या घटना रोखण्याबाबतसाठी उपाययोजनांबाबतचे मार्गदर्शन या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक आरोटे यांनी केले, तर रात्रीची गस्त, खासगी सुरक्षा, सीसीटीव्हीबाबतही सूचना केल्या.

या बैठकीला वावोशी व्यापारी संघाचे अध्यक्ष शांताराम हाडप, हैदरशेठ, हरेश ओसवाल, दीपक झेमसे, राकेश पाटील, अशोक ओसवाल, डोणवत येथील व्यापारी असोसिएशनचे ॲड.अमोलराजे बांदल-पाटील, अमोल भापकर, महेश पाटील, महेश बांदल, उत्तम श्रीखंडे, आरावकर, मानाजी मोरे, किशोर थोरवे आदी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नेरळमध्ये ज्ञानेश्वरी पारायण महोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ वारकरी सांप्रदायाच्या वतीने आयोजित अखंड ज्ञानयज्ञ आणि ज्ञानेश्वरी पारायण महोत्सवाचा प्रारंभ झाला. तीन दिवस हा महोत्सव चालणार आहे. या महोत्सवाचे आयोजन नेरळ गावातील हनुमान मंदिर येथे करण्यात आले असून प्रवचन, कीर्तन, जागर भजन आणि पारायण असे कार्यक्रम सुरू आहेत.



वारकरी सांप्रदाय मंडळ नेरळ आणि परिसर यांच्या माध्यमातून सालाबादप्रमाणे साडेतीन दिवसाचे अखंड ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित केला गेला आहे. या सोहळ्याची सुरुवात गणेश पूजन, हनुमान पूजन, दीप पूजन, कलश पूजन, माऊली पूजन, विठ्ठल रखुमाई पूजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पूजन, तुळस पूजन, वीणा पूजन आणि ध्वजारोहण करून झाली.

दररोज सकाळी ज्ञानेश्वरी पारायण होत असून त्यांचे नेतृत्व हभप शिवराम महाराज तुपे, पंढरीनाथ मनवे, विजय थोरवे, मुक्ताबाई दहीवलिकर, उर्मिला हजारे, शांताराम साळुंखे, नथुराम घडगे, पद्मा थोरवे, रोहिणी देशमुख, वर्षा जोगळेकर, चित्रा पाटील, सुवर्णा बोभाटे, गणेश मनवे आदी करीत आहेत.

या सोहळ्यात प्रवचन हभप शिवराम तुपे, रामदास साळुंखे यांचे झाले. हरिपाठ श्री माऊली हरिपाठ मंडळ चिंचवली, आत्मउन्नती विश्वशांती वारकरी मंडळ वांगणी; जागर भजन श्री गणेश प्रसदिक भजन मंडळ नेरळ, श्री साईबाबा प्रासादिक भजन मंडळ मोहाची वाडी यांनी केले; तर हरिकीर्तन ज्ञानेश्वरी घाटे आणि राजेश महाराज भोईर यांनी सादर केले.

सायंकाळी गाव प्रदक्षिणा आयोजित केली असून हनुमान मंदिर ते नेरळ गावातील सर्व भागात पायी दिंडी फिरणार आहे. या दिंडीला हरिपाठ मंडळ नेरळ यांची साथ लाभणार असून दीपोत्सव आणि रात्री ज्ञानेश्वर महाराज शिंदे खोपोली यांचे हरिकीर्तन आयोजित केले आहे. महोत्सवाची सांगता दिलीप महाराज राणे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नागो गवळी, उपाध्यक्ष लक्ष्मण हजारे, पद्मा थोरवे, सचिव उमेश यादव, खजिनदार पंढरी मनवे, कार्याध्यक्ष काशिनाथ ठमके, शांताराम पळसकर तसेच संदीप मोडक, सुनीता राणे आदी पदाधिकारी आणि सदस्य परिश्रम घेत आहेत.

# वाढदिवसानिमित्त अंध मुलांना जॅकेट वाटप

**महाड : प्रतिनिधी**

महाडचे भुमिपुत्र व भाजपचे पर्वती (पुणे) मतदारसंघाचे सरचिटणीस राजाभाऊ कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार माधुरी मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत अद्वैत संस्थेच्या अंध मुलांना थंडीचे जॅकेट वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास मतदारसंघाचे अध्यक्ष प्रशांत दिवेकर, मनोज देशपांडे, सरचिटणीस विनया बहुलीकर, शैलेश देशपांडे, अजय भोकरे, तेजस गाडे, पी.टी.जगदाळे, विकास शिंदे, जयराज मोरे, रामदास सुर्वे, सुनील पवार, रूपेश पारटे, अजित ढोकळे, गणेश जाधव, शैलेश उतेकर आदी उपस्थित होते. सर्वांनी कदम यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.



# हार्दिक मुंबई संघात परतणार?

## आयपीएलमध्ये मोठा फेरबदल होण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

पदार्पणाच्या हंगामातच गुजरात टायटन्स संघाला आयपीएल स्पर्धेचे जेतेपद मिळवून देणारा कर्णधार हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सकडे परतण्याची शक्यता आहे. २०१५मध्ये हार्दिकने मुंबई इंडियन्ससाठीच खेळताना आयपीएल पदार्पण केले होते. क्रिकइन्फो वेबसाईटने दिलेल्या वृत्तानुसार मुंबई संघ तब्बल १५ कोटी रुपये खर्चून हार्दिकला ताफ्यात घेणार असल्याचे वृत्त आहे. सगळे जुळून आले तर आयपीएल स्पर्धेतील हा सगळ्यात मोठा ट्रेडऑफ ठरेल.

आयपीएलच्या २०२४ हंगामासाठी १९ डिसेंबरला दुबईत लिलाव होणार आहे, पण त्याआधी २६ नोव्हेंबरला ट्रान्सफर विंडोचा अवधी संपत आहे. ट्रान्सफर विंडो अंतर्गत



संघांना परस्पर सामंजस्याने खेळाडूंची अदलाबदल करता येते.

२०२२मध्ये मोठ्या लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सने रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह आणि कायरेन पोलार्ड यांना रिटेन केले होते. हार्दिकला रिटेन न करता पोलार्डला संघात कायम ठेवल्याने मुंबई इंडियन्सच्या धोरणांवर टीकाही झाली होती. मुंबईने हार्दिकच्या रूपात गमावलेली संधी आयपीएलमधील नवा संघ गुजरात टायटन्सने हेरली. कर्णधार हार्दिक आणि मार्गदर्शक आशिष नेहरा या जोडगोळीने पहिल्याच हंगामात संघाला जेतेपद मिळवून दिले. हार्दिकच्या नेतृत्वाचे कौतुक झाले होते. या यशातूनच हार्दिकला भारताच्या ट्वेन्टी-२० संघाची कमान मिळाली होती. आयपीएलच्या अंतिम लढतीत हार्दिकच सामनावीर होता. २०२३मध्येही गुजरात टायटन्स संघाने अंतिम फेरीत धडक मारली, मात्र चेन्नईने त्यांना नमवले. हार्दिकच्या नेतृत्वात गुजरातने प्राथमिक फेरीअखेर गुणतालिकेत अव्वल स्थान राखत प्लेऑफ्समध्ये प्रवेश केला होता.

नुकत्याच झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या लढतीदरम्यान हार्दिक दुखापतग्रस्त झाला होता. मुंबई इंडियन्सने सर्वकाही जुळून आणले तर ट्रेडऑफ होणारा हार्दिक हा आयपीएलमधला तिसरा कर्णधार असेल. याआधी रविचंद्रन अश्विन किंग्ज इलेव्हन पंजाबकडून दिल्लीकडे, तर अजिंक्य रहाणे राजस्थानकडून दिल्लीकडे आला होता.

रोहित शर्मा भारतासाठी ट्वेन्टी२० खेळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे हार्दिककडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात येण्याची शक्यता आहे.

### 'या' खेळाडूंची अदलाबदल

अन्य ट्रेडऑफ्समध्ये लखनौ सुपरजायंट्सने रोमारिओ शेफर्डला रिलीज केले आहे. अष्टपैलू शेफर्ड आता मुंबई इंडियन्ससाठी खेळताना दिसेल. देवदत्त पड्डीकल आता राजस्थान रॉयल्सऐवजी लखनौ सुपरजायंट्स संघासाठी खेळताना दिसेल. या बदल्यात राजस्थानने वेगवान गोलंदाज अवेश खानला संघात समाविष्ट केले आहे. अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने आयपीएल २०२४साठी उपलब्ध नसल्याचे कळवले आहे. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्सला संघात बदल करावे लागतील.

# राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत रायगडला दुहेरी यश

## अक्षय शनमुगमने सुवर्ण, तर दिनेश पवारने कांस्यपदक जिंकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बंगळुरू येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय क्लासिक बेंचप्रेस स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील अक्षय शनमुगम याने नवीन राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक, तर मास्टर स्पर्धेत दिनेश पवार याने कांस्यपदक जिंकत विजयी सलामी दिली आहे. त्यांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.

आंतरराष्ट्रीय पदकविजेता खेळाडू अक्षय शनमुगम (आयर्न मेट जिम, खोपोली) याने खुल्या गटातील स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात नवीन राष्ट्रीय विक्रम करीत सुवर्ण पदक पटकाविले आहे, तर मास्टर स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात आंतरराष्ट्रीय पदकविजेता खेळाडू दिनेश पवार (लोखंडे जिम, खोपोली) याने कांस्यपदकाला गवसणी घातली. या दोन्ही पदकविजेत्या खेळाडूंचे आणि त्यांचे





प्रशिक्षक, जिम संचालक यांचे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई यांनी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य खेळाडूंना केले होते. त्याचेही चीज झाले आहे.

# कर्जतमध्ये कराटे प्रशिक्षण उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर आणि ब्लॅक बेल्ट परीक्षा नुकतीच कर्जत येथे झाली. या शिबिरात पनवेल, खोपोली, पेण, कर्जत, तालुक्यातील एकूण ७० कराटेपटू सहभागी झाले होते.

शिबिरात ब्लॅक बेल्ट परीक्षेत राजेंद्र कान्हेरे, प्रथम बहिरा, पंक्ती पाठक, हर्षल घरत, किसन बोगटी, सानवी जाधव, आदित्य खाडे, जयराज बोराडे, हार्दिक तुरे, ऋतुजा जाधव, संदेश सुनार, धनंजय शर्मा यांनी; फर्स्ट डिग्री ब्लॅक बेल्ट परीक्षेत आस्था चौधरी, रुत्वी पाटील, आलोक निर्मल, कृपाश्री शेट्टी, अथर्व रांजणे यांनी; तर थर्ड डिग्री ब्लॅक बेल्ट परीक्षेत परशुराम शेट्टीगिरी हिने यश संपादित केले.

शिबिरादरम्यान महाराष्ट्र पोलीस कमांडो ट्रेनर हांशी प्रदीप मोहिते, शिहान सुनील वडके यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले तसेच शिहान रवींद्र म्हात्रे, सागर कोळी, पियुष सदावर्ते, निलेश भोसले, प्रशांत गांगुर्डे, सेन्सई भालचंद्र भोईर, जीवन धाकवळ, संदीप आगीवले, संजय पाटील, प्रवीण पाटील, प्रतिक कारंडे यांनी प्रशिक्षण दिले.

सर्व यशस्वी खेळाडूंचे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष रेंशी डॉ. मंदार पनवेलकर यांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा
# सात्त्विक-चिराग उपांत्य फेरीत

**शेन्झेन : वृत्तसंस्था**

भारताच्या सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या आघाडीच्या जोडीने चीन



मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. पुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉयला मात्र पराभव पत्करावा लागल्याने भारताचे एकेरीतील आव्हान संपुष्टात आले.

पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत अग्रमानांकित सात्त्विक-चिराग जोडीने आक्रमक खेळ करताना इंडोनेशियाच्या १३व्या मानांकित लिओ रॉली कार्नाडो-डॅनिएल मार्टिन जोडीचा २१-१६, २१-१४ असा पराभव केला. भारतीय जोडीने या वर्षी इंडोनेशिया, कोरिया आणि स्विस स्पर्धेत विजेतेपद मिळवले आहे. आता उपांत्य फेरीत भारतीय जोडीसमोर चीनच्या हे जी टिंग-रेन शिआंग यू जोडीचे आव्हान असेल. टिंग-यू जोडीने आपल्याच देशाच्या आठव्या मानांकित लियू यू शेन-ओऊ शुआन यी जोडीला २१-१५, २१-१५ असे पराभूत केले.

पुरुष एकेरीत भारताचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. प्रणॉयला जपानच्या कोडाई नाराओकाकडून ९-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला.


# मुंबईत क्रीडा महोत्सव रंगणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकसर यांनी नवीन महापौर खुर्चीवर विराजमान होण्यापूर्वी मुंबईत क्रीडा महोत्सव आयोजित केला जाईल, अशी घोषणा केली आहे. त्यामुळे लवकरच मुंबईत मुंबई महापौर चषकाच्या धर्तीवर क्रीडा महोत्सव पहायला मिळेल.

मुंबईत गेल्या कित्येक वर्षांपासून मुंबई महापौर चषक स्पर्धांचे आयोजन महापालिकेतर्फे केले जात होते. या स्पर्धेत मुंबई शहर व मुंबई उपनगरमध्ये वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धा दरवर्षी एका ठराविक कालावधीत होत असत. त्यामुळे मुंबईतील क्रीडाक्षेत्रात जोरदार स्पर्धा पाहायला मिळत असत. कोविडपासून गेली पाच वर्षे मुंबई महापौर चषक स्पर्धा होऊ शकली नाही. त्यामुळे मुंबई स्पोर्ट्सने बाळ तोरसकर, प्रकल्प प्रमुख यांच्या नियोजनाखाली पुढाकार घेत मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकसर यांना महापौर चषकाच्या धर्तीवर स्पर्धा, क्रीडा महोत्सव मुंबईत आयोजित करण्याबाबत निवेदन दिले होते.

# टेनिसपटू नागल, मुकुंदचा पाकिस्तानात खेळण्यास नकार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचे आघाडीचे टेनिसपटू सुमित नागल आणि ससीकुमार मुकुंद यांनी पुढील वर्षी फेब्रुवारीत होणाऱ्या डेव्हिस चषक लढतीसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिला आहे. नागल आणि मुकुंदच्या निर्णयामुळे भारतासमोर संघनिवडीची समस्या निर्माण झाली आहे.

रोहन बोपण्णाच्या डेव्हिस चषक निवृत्तीनंतर भारतीय संघ या स्पर्धेत प्रथमच एखादी लढत खेळणार आहे. विशेष म्हणजे ही जागतिक गट-१ मधील लढत आहे. त्यामुळे या लढतीला फार महत्त्व आहे. नागल हा पुरुष एकेरीतील भारताचा सध्याचा सर्वोत्तम टेनिसपटू असून तो एटीपी क्रमवारीत १४१व्या स्थानी आहे. मुकुंद हा ४७७व्या स्थानावर असून तो क्रमवारीनुसार एकेरीतील भारताचा दुसरा सर्वोत्तम टेनिसपटू आहे.

नागल आणि मुकुंद या दोघांनीही या लढतीसाठी आपली अनुपलब्धता 'एआयटीए'ला कळवली आहे, मात्र त्यांनी या निर्णयामागील कारण स्पष्ट केलेले नाही, परंतु सूत्रांच्या माहितीनुसार त्यांनी या लढतीत न खेळण्यामागे पाकिस्तानात जावे लागणे हा मुद्दाच नसल्याचे समजते. 'पाकिस्तानने ही लढत हिरवळीवर (ग्रास कोर्ट) खेळविण्याचा निर्णय घेतला, त्या वेळीच आपण या लढतीत खेळण्यास उत्सुक नसल्याचे सुमितने संघ व्यवस्थापनाला कळवले होते, तर मुकुंदने वैयक्तिक कारणाने ही लढत खेळण्यास नकार दिला आहे,' अशी माहिती 'एआयटीए'च्या सूत्रांकडून देण्यात आली.

खेळाडूंच्या निर्णयाबाबत 'एआयटीए'ने नाराजी व्यक्त केली आहे. देशासाठी खेळण्याचा प्रश्न असताना खेळाडू असा विचार कसा करू शकतात? त्यांनी नकारामागचे कारण स्पष्ट करावे. आम्ही हा विषय आता प्रशासकीय समितीसमोर ठेवणार आहोत. खेळाडू आजारी किंवा दुखापतग्रस्त असेल, तर समजून घेता येते, मात्र येथे काहीच ठोस कारण नाही. मुकुंदने तर यापूर्वी दोन वेळा देशासाठी खेळण्यास ऐन वेळी नकार दिला आहे,' असे 'एआयटीए'चे सचिव अनिल धुपर म्हणाले.

# ज्या ट्रॉफीला तुम्ही डोक्यावर घ्यायला हवे, त्याच ट्रॉफीवर पाय ठेवून बसणे योग्य नाही!

## मोहम्मद शमीची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी भारताचा सहा विकेट्सने पराभव करून ऑस्ट्रेलियाने सहाव्यांदा एकदिवसीय



विश्वचषक जिंकला, ज्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या ड्रेसिंग रूममध्ये आनंदोत्सव साजरा करण्यात आला. उत्सवादरम्यान, अष्टपैलू मिचेल मार्श ट्रॉफीवर पाय ठेवून बसलेला एक फोटो व्हायरल झाला आणि सोशल मीडियावर यामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या. आता मार्शच्या कृतीवर भारताचा सर्वात यशस्वी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने प्रतिक्रिया दिली आहे.

मोहम्मद शमीने पत्रकारांसमोर या विषयावर भाष्य केले. मला खूप वाईट वाटले. ज्या चषकासाठी जगातील सर्व संघ लढतात ज्या ट्रॉफीला तुम्ही डोक्यावर घ्यायला हवे, मात्र त्याच ट्रॉफीवर पाय ठेवून बसणे हे बघणे मला आवडलेले नाही, असे शमी म्हणाला.

दरम्यान, मोहम्मद शमीने विश्वचषकात गमावलेल्या चार सामन्यांविषयीसुद्धा भाष्य केले. शमी म्हणाला की, जेव्हा तुम्ही संघात असूनही खेळायला मैदानात नसता तेव्हा मानसिकदृष्ट्या सबळ राहणे खूप गरजेचे आहे. यावेळी दडपण येते, पण तुम्हाला संधी मिळणार असते आणि जेव्हा तुम्ही चांगली कामगिरी करता तेव्हा ते समाधानही तुमच्या वाट्याला येणार असते.

विश्वचषकात मोहम्मद शमी हा भारताचा हुकुमी एक्का सिद्ध झाला होता. त्याने मुंबईतील उपांत्य फेरीत न्यूझीलंडविरुद्ध ५७ धावांत सात विकेट्सच्या विक्रमी स्पेलसह सात सामन्यांत २४ विकेट घेतल्या.

### एफआयआर दाखल

वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवण्याच्या कृतीवरून अलिगढमधील एका आरटीआय कार्यकर्त्याने मिशेल मार्शच्या विरोधात एफआयआर नोंदवला आहे. आरटीआय कार्यकर्ते पंडित केशव यांनी ही तक्रार दाखल केली असून मार्शने वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवण्याच्या कृतीमुळे भारतीय क्रिकेट संघाच्या चाहत्यांच्या भावना दुखावल्याचा आरोप केला आहे. प्राप्त माहितीनुसार केशव यांनी तक्रारीची एक प्रत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही पाठवली आहे.

# राशिद खानची बीग बॅश लीगमधून माघार

**काबूल : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानचा स्टार फिरकीपटू राशिद खानच्या पाठीवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांना ही माहिती दिली. पाठीच्या शस्त्रक्रियेमुळे राशिदने ऑस्ट्रेलियात खेळल्या जाणाऱ्या बिग बॅश लीगच्या यंदाच्या हंगामातून आपले नाव मागे घेतले आहे.

राशिद हा बीबीएलमध्ये अॅडलेड स्ट्रायकर्स संघाकडून खेळतो. बीबीएलचा तेरावा हंगाम ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे, तर २४ जानेवारीला अंतिम सामना खेळला जाईल. राशिद २०१७पासून बीग बॅश लीग खेळत आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या ६९ सामन्यांमध्ये ९८ बळी घेतले आहेत.

राशिदने शेवटचा सामना यंदाच्या विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेविरूद्ध खेळला. त्याला यंदाच्या विश्वचषकात साजेशी कामगिरी करण्यात यश आले. राशिदने नऊ सामन्यांत ४.४८च्या सरासरीनुसार ११ बळी घेतले, तर ९४.५९च्या सरासरीनुसार १०५ धावा केल्या.



राशिदने इस्पितळातील एक फोटोदेखील शेअर केला. तुम्हा सर्वांच्या प्रार्थनांसाठी खूप खूप आभार... शस्त्रक्रिया चांगली पार पडली आणि आता विश्रांती घेत आहे, असे राशिदने कॅप्शनमध्ये म्हटले आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com